cmyk

## संपादकीय

### आता टाळी देण्याशिवाय पर्याय नाही

प्रादेशिक राजकारणात महाराष्ट्रात पवार आणि ठाकरे हे दोन ब्रँड आहेत असे मानले जाते. शरद पवार यांचा राजकीय प्रवास दीर्घ आणि सत्ताकेंद्रित राहीला आहे. तर ठाकरे यांचा प्रवास हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असेपर्यंत चढता आणि रोखठोक, हिंदुत्ववादी होता पण नंतरच्या काळात अनेक स्थित्यंतरे होत गेले. आज पवार आणि ठाकरे यांच्या पिढ्या नाजूक वळणावर उभ्या आहेत. मुंबई महापालिका हा ठाकरे यांचा प्राण मानला जातो आणि या महापालिकेतील सत्ता जाते की राहते अशी अस्तित्वाची, परीक्षेची वेळ समोर असलेने ठाकरे बंधू एकमेकांना टाळ्या देत गाठीभेटी घेत आहेत आणि दसरा मेळाव्यात शिवसेना उबाठा व मनसे म्हणजे राज ठाकरे यांची युती होणार अशी अटकळ बांधली जाते आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१३९ | रविवार, दि.१४ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### पुढील दोन दिवस राज्यात अती पावसाचा इशारा

मुंबई : राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठं पाऊस तर कुठं उघडीप झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, गेल्या चार ते पाच दिवसांपासून राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. तर काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. यामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. शेती पिकांना देखील फटका बसला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस महाराष्ट्रात मध्यम ते जोरदार अश्या पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातही रविवार व सोमवार रोजी संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### टाटा टेक्नॉलॉजी आणि शासन यांच्यात सामंजस्य करार

मुंबई: टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्यामार्फत रामटेक येथे कौशल्यवर्धन केंद्र (सीआयआयटी) सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेडतर्फे प्रकल्प प्रमुख सुशीलकुमार व महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. रामगिरी येथे नागपूर जिल्ह्यातील रामटेक येथे टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्यामार्फत खासगी सहभागातून कौशल्यवर्धन केंद्राची उभारणी करण्यासंदर्भात करार झाला. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, प्रकल्प समन्वयक प्रितम गंजेवार आदी उपस्थित होते.

### आजपासून वैष्णोदेवी यात्रा पुन्हा सुरू होणार

जम्मू: खराब हवामान आणि दर्शन मार्गाची आवश्यक दुरुस्ती या कामांमुळे तात्पुरते थांबविण्यात आलेली श्री माता वैष्णो देवी यात्रा आता १४ सप्टेंबर (रविवारी) पासून पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. तथापि, हवामान अनुकूल असेल तरच प्रवासाची सुरूवात करणे शक्य होईल.

दुरुस्तीचे काम आता जवळजवळ पूर्ण झाले आहे आणि जर हवामानाने सहकार्य केले तर १४ सप्टेंबरपासून भक्त पुन्हा आईला पाहण्यास सक्षम असतील. पण प्रवास सुरू करण्यापूर्वी अधिकृत वेबसाइट किंवा हेल्पलाइन नंबरद्वारे हवामान आणि ट्रॅक स्थितीबद्दल माहिती मिळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गेल्या महिन्याच्या २६ तारखेला ढगफुटीमुळे भूस्खलनात ३४ यात्रेकरूंचा मृत्यू झाला. या घटनेत २० लोक गंभीर जखमीही झाले. या घटनेनंतर वैष्णो देवी यात्रा त्वरित थांबविण्यात आली होती.

### सोने झाले स्वस्त

पुणे: सोन्याचे दर गेल्या महिन्याभरापासून १ लाखापेक्षा जास्त आहेत. शनिवारी (१३ सप्टेंबर) सोन्याचे दर १,११,१७० रुपये प्रति तोळा झाला होता. मागील आठवड्याभरात सोन्याचे दर सर्वाधिक वाढले आहेत. शनिवारी जरी सोन्याचे दर काही प्रमाणात कमी झाले असले तरीही ते सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे नाहीत. सणासुदीच्या दिवसांत अनेकजण सोने खरेदी करतात. परंतु सध्या सोन्याने उच्चांक गाठला आहे. त्यामुळे सोने खरेदी करावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना पडलेला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सोन्याचे दर वाढत आहेत. शनिवारी सोन्याचे दर कमी झाले आहेत. प्रति तोळ्यामागे ११० रुपयांनी घसरण झालेली दिसली.

# १ ऑक्टोबरपासून उसाचा गळीत हंगाम सुरु

## निर्यातीसाठी साखरेचा मोठा साठा ठेवणार

पुणे । प्रतिनिधी

**यावर्षी १ ऑक्टोबरपासून उसाचा गळीत हंगाम सुरु होणार आहे. या नवीन पीक हंगामात निर्यातीला परवानगी देण्यासाठी पुरेसा अतिरिक्त साखरेचा साठा ठेवण्यात येणार असल्याची माहिती एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने दिली आहे. भारतातील साखर निर्यातीमुळे जागतिक किमतींवर दबाव येऊ शकतो, परंतु यामुळे**



**भारत सरकारला देशांतर्गत साखरेच्या किमतींना आधार मिळण्यास आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पिकासाठी किमान आधारभूत किंमत मिळण्यास मदत होईल.**

देशातील काही राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात ऊसाचे क्षेत्र आहे. त्यामुळे दरवर्षी भारतात मोठ्या प्रमाणात साखरेचे उत्पादन होते. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उत्पादक देश म्हणून जगभरात भारताची ओळख आहे. दरम्यान, नवीन हंगामात साखर निर्यात होण्याची शक्यता आहे. उत्पादनात घट असूनही भारताने चालू विपणन वर्षात (सप्टेंबरमध्ये संपणाऱ्या) १० लाख मेट्रिक टन साखर निर्यातीला परवानगी दिली होती. भारतीय साखर आणि जैव-ऊर्जा उत्पादक संघटनेने दिलेल्या माहितीनुसार २०२५-२६ या मार्केटिंग वर्षात (१ ऑक्टोबरपासून) उत्पादन ३४.९ दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत वाढू शकते. ▶▶ पान २ वर

### उसापासून इथेनॉलचे विक्रमी उत्पादन

पुढील हंगामाचे उत्पादन चांगले दिसते आणि देशांतर्गत वापर आणि इथेनॉल उत्पादनाच्या गरजा पूर्ण केल्यानंतरही निर्यातीसाठी पुरेसा साठा उपलब्ध असणार आहे. नवीन हंगामात उसापासून सुमारे ४.८ अब्ज लिटर इथेनॉलचे उत्पादन होण्याची अपेक्षा आहे, जो आतापर्यंतचा विक्रम असणार आहे.

# आदिवासीतून आरक्षण दिल्यास सरकारमधून बाहेर पडेन

## एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आ.पाडवी यांचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

आरक्षणावरून पुन्हा एकदा डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. शिंदेसेनेचे आमदार आमश्या पाडवींनी आरक्षणाच्या मुद्यावरून आक्रमक भूमिका घेतली आहे. बंजारा आणि धनगर समाजाला आदिवासीतून आरक्षण दिले तर सरकारमधून बाहेर पडेन, असा इशारा आमदार पाडवी यांनी दिला आहे. आमदार असेपर्यंत कुणालाही आदिवासी आरक्षणात घुसू





देणार नाही, असेही ते म्हणाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात आरक्षणावरून पुन्हा राजकीय तणाव वाढला आहे.

आरक्षणासाठी सत्ताधारी आमदारच आता मैदानात उतरले आहेत. शिंदे सेनेचे आमदार आमश्या पाडवी यांनी फडणवीस सरकारला इशारा दिला आहे. सरकारने बंजारा आणि धनगर समाजाला आदिवासी ग्रुप आरक्षण दिले तर मी सरकारमधून बाहेर पडणार, असा आमदार पाडवी यांनी सरकारला इशारा दिला. आदिवासींमध्ये बंजारा समाजाला आणि धनगर समाजाला घुसू देणार नाही. हैदराबाद गॅझेट आले म्हणून कोणीही आदिवासीत येणार असे होणार नाही. ▶▶ पान २ वर

# ३२ टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करा-जरांगे पाटील

जालना । प्रतिनिधी

'मराठा धरून ओबीसी लोकसंख्या ६० टक्के आहे. बत्तीस टक्के आरक्षणात तुम्ही वेगळे प्रवर्ग केले, ते सगळे प्रवर्ग रद्द करायला पाहिजेत. आमच्या तरी नोंदी आहेत, तुमच्या तर नोंदी नाहीत, काहीही नाहीत, असा टोला मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे शनिवारी (दि.१३) पत्रकारांशी बोलताना अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना



लगावला.

गायकवाड आयोगाने मराठा समाज मागास सिद्ध केलेले आहे, हे सगळ्यांनाच माहीत आहे. परंतु राज्य सरकारने जे दहा टक्के आरक्षण दिले आहे, ते ५० टक्क्यांच्या वर आहे. त्यामुळे आम्ही वारंवार सांगत आाहोत की, ५० टक्क्यांच्या वर गेलेले आरक्षण टिकत नाही. देणारे तेच आहेत आणि घेणारे तेच आहेत, सगळे सरकारचेच लोक आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण हक्काचे आहे आणि ते आम्ही मिळवले आहे. मराठ्यांना एक आरक्षण आहे, दोन आरक्षण आहे, तीन आरक्षण आहे असे जर प्रत्येक क्षेत्रात वाटत ▶▶ पान २ वर

### ..तर शासकीय कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारकडून एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांना ओळखपत्र लावणे अनिवार्य केले आहे. शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेत आपल्या पदाचे ओळखपत्र शरिराच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक केले आहे. ते समोरून येणाऱ्या व्यक्तीला स्पष्टपणे दिसेल, असे आदेश देण्यात आले आहेत.

शासकीय कार्यालयात गेल्यावर अनेकदा कोणती व्यक्ती, कोणत्या पदावर कार्यरत आहे हे कळत नाही. त्यामुळे वादंग झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. त्यानंतर आता याबाबत महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेत आपल्या पदाचे ओळखपत्र बंधनकारक केले गेले ▶▶ पान २ वर

## अंमळनेर ते बीड रेल्वे मार्गावर आजपासून तीन दिवस रेल्वेची हाय स्पीड चाचणी

अहिल्यानगर / बीड । प्रतिनिधी

अहिल्यानगर -बीड -परळी या रेल्वे मार्गाचे काम गतीने सुरू आहे. याच दरम्यान अहिल्यानगर ते अंमळनेर रेल्वे इंजिन चाचणी पूर्ण झाली असून, अंमळनेर ते बीड अंतर्गत हाय स्पीड रेल्वे चाचणी दि. १४,१५ आणि १६ सप्टेंबर रोजी म्हणजेच तीन दिवस होणार असल्याचे रेल्वेच्या पुणे विभागाने कळवले आहे.

याबाबात पुणे विभाग, मध्य रेल्वे यांच्याकडून सांगण्यात आले आहे की, अंमळनेर-बीड रेल्वे विभागावरील बहुप्रतिक्षित अहिल्यानगर बीड या मार्गावर १७ सप्टेंबर पासून डेमो (डिझेल इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट) सेवा सुरू होणार आहे. त्यापूर्वी



अंमळनेर ते बीड पर्यंत १४, १५ आणि १६ सप्टेंबर २०२५ रोजी या विभागात सतत स्पीड ट्रायल रनचे वेळापत्रक आहे. या ट्रायल रन नियमित प्रवासी सेवा सुरू करण्यापूर्वी ट्रॅकची अखंडता, सिग्नल सिस्टम आणि एकूण सुरक्षा मानके पडताळण्यास ▶▶ पान २ वर

## अल्पवयीन मुलीचे अपहरण करणारा केजचा तरुण तेलंगणातून ताब्यात

केज । प्रतिनिधी

**वीस वर्षीय तरुणाने एका १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून थेट तेलंगणा राज्य गाठले होते. आता पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने तपास करून मुलीसह आरोपीला तेलंगणा राज्यातून ताब्यात घेतले आहे.**

केज तालुक्यातील काशिदवाडी येथून दि.३० मे रोजी १२ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या १६ वर्ष वयाच्या मुलीचे अपहरण केले होते. अपहृत मुलीच्या वडिलांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेला तीन महिन्या पेक्षा जास्त कालावधी उलटून देखील त्या प्रकरणी संशयित आरोपींचा ठावठिकाणा लागत नव्हता. या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम यांनी संशयित अपहरणकर्ता हर्षद बालाजी जाधवर याच्यावर लक्ष्य केंद्रित करून तांत्रिक पद्धतीने तपास केला. संशयिताच्या नातेवाईकांचे फोन कॉल व सीडीआर यांचा तपास केला असता आरोपींचे लोकेशन हे तेलंगणा राज्यात आढळून आले. ▶▶ पान २ वर

## मारहाण करत बीडमधुन तरूणाचे अपहरण

### भुममध्ये आरोपींच्या मुसक्या आवळल्या

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील गोरे वस्ती परिसरात एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नागनाथ नन्नवरे यांना दहा ते बारा जणांच्या टोळक्याने लाठ्या-काठ्यांनी अमानुष मारहाण करून नंतर एका चारचाकी वाहनात जबरदस्तीने अपहरण करण्यात आले आहे. ही घटना संपूर्णपणे मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाली असून परिसरात व्हिडीओ क्लिप मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.सदरच्या घटनेने प्रशासनातही खळबळ उडाली. त्यांनी तात्काळ या प्रकरणीच दखल घेत यातील आरोपीतांना भूम तालुक्यातून ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. अपहरण झालेल्या नागनाथ नन्नवरे याचीही सुटका करण्यात आली आहे.सदरचा प्रकार का घडला याचा तपास पोलीस करत आहेत. बीड शहरानजीक असलेल्या ▶▶ पान २ वर

## लक्ष्मण हाकेंनी अक्रस्ताळेपणा थांबवावा-आ.सुरेश धस

बीड । प्रतिनिधी

राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण तापलं असून ओबीसी आणि मराठा आमने-सामने आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच, राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करत कुणबी मराठा-कुणबी समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा शासन आदेश जारी केल्यानंतर बंजारा समाजाही हैदराबाद गॅझेटियरचा आधार घेत एसटीमधून आरक्षण मागत आहेत. बंजारा समाजाच्या या मागणीला बीडमधील भाजप नेते आणि आमदार सुरेश धस यांनी पाठिंबा दिला आहे. तसेच, मराठा आणि ओबीसी समाजात एकमेकांचा होणारा द्वेष थांबला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करत लक्ष्मण हाके यांनी अक्रास्तळेपणा थांबवावा, असा सल्ला आमदार धस यांनी दिला आहे.



मराठा-ओबीसी लग्नासंदर्भातील हाकेंच्या वक्तव्यावर त्यांनी भाष्य केले. जिल्ह्यातील आष्टी मतदार संघात विविध प्रश्नासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत मतदारसंघातील कुंटेफळ तलाव, रेल्वे प्रश्न, सिंदफना पाणी प्रकल्प यासह इतर प्रकल्प प्रश्न मार्गी लावण्यात आल्याची माहिती आमदार धस यांनी दिली. त्यानंतर, राजकीय ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८.०० क्विंटल | २,५०० | २,८७० | २,६७२ |
| ज्वारी/हायब्रिड :९१.०० क्विंटल | १,८०० | २,९०१ | २,३५३ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| उडीद : ५७.५० क्विंटल | ४,२०० | ५,९६१ | ५,०५२ |
| बाजरी: ५५.५० क्विंटल | २,१०१ | २,८०० | २,५८० |
| मुग:९.०० क्विंटल | ३,९०१ | ७,१०० | ५,६७५ |
| सोयाबीन: २२.५० क्विंटल | ४,१०० | ४,३११ | ४,२३७ |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ४,५७० | ५,४०० | ४,९८५ |

## कराडच्या कुटुंबीयांना २५ लाख द्या

### धनंजय मुंडेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ओबीसी आणि मराठा आरक्षणाचा मुद्दा गंभीर बनला असून मराठा समाजाच्या काही युवकांनी आत्महत्येसारखए टोकाचे पाऊल उचलले होते. त्यानंतर, आता ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी लातूर जिल्ह्यातील वांगदरी येथील एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. लातूरच्या वांगदरी येथील भरत कराड याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. आता



भरत कराड याच्या कुटुंबीयाला राज्य सरकारने २५ लाखांची मदत करावी तसेच त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला पात्रतेप्रमाणे शासकीय नोकरी द्यावी,अशी मागणी माजी मंत्री तथा ▶▶ पान २ वर

# ७० हजार मराठा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद?

## राज्य सरकारचा निर्णय ; सारथी संस्थेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती थांबवण्याची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य शासनाने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयामुळे मराठा समाजातील हजारो विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला आहे. सारथी संस्थेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती थांबवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला असून, यामुळे राज्यातील जवळपास ७० हजार मराठा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार आहेत.**

सारथी संस्थेमार्फत आठवीतील एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या मराठा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात होती. त्यांना दरमहा ९०० रुपये शिष्यवृत्ती स्वरूपात मिळत असे, जी चार वर्षांसाठी लागू होती. या शिष्यवृत्तीचा लाभ वार्षिक उत्पन्न १.५ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना मिळत होता. आतापर्यंत शिष्यवृत्ती देण्यासाठी सरकारला अंदाजे ४० कोटी रुपये खर्च करावे लागले असते. मात्र, सरकारने अचानक हा लाभ बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाविरोधात अखिल भारतीय मराठा महासंघाने तीव्र नाराजी व्यक्त केली ▶▶ पान २ वर

### विद्यार्थ्यांच्या करिअरवर परिणाम होणार

या निर्णयामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या मागास मराठा विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. शिष्यवृत्ती थांबल्याने त्यांचे शिक्षण, राहणीमान आणि पुढील करिअरवर परिणाम होणार आहे. 'शासनाचा हा एकतर्फी निर्णय नेमका कोणत्या हेतूने घेतला गेला?' असा सवालही मराठा संघटनांनी उपस्थित केला आहे.

### अन्यथा सरकारला परिणाम भोगावे लागतील

राज्य शासनाने अचानक सारथी संस्थेतर्फे दिली जाणारी शिष्यवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने राज्यातील सुमारे ७० हजार मराठा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अचानक बंद होणार आहे. भुजबळांचे ऐकून मराठ्यांच्या पोरांवर अन्याय करू नका. याबाबत आम्ही सरकारला कळवले आहे. पोरांचे पैसे द्या, अन्यथा सरकारला परीणाम भोगावे लागतील, असा इशारा मनोज जरांगे यांनी याबाबत दिला आहे.

cmyk

## अग्रलेख

# आता टाळी देण्याशिवाय पर्याय नाही

प्रादेशिक राजकारणात महाराष्ट्रात पवार आणि ठाकरे हे दोन ब्रँड आहेत असे मानले जाते. शरद पवार यांचा राजकीय प्रवास दीर्घ आणि सत्ताकेंद्रित राहीला आहे. तर ठाकरे यांचा प्रवास हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे असेपर्यंत चढता आणि रोखठोक, हिंदुत्ववादी होता पण नंतरच्या काळात अनेक स्थित्यंतरे होत गेले. आज पवार आणि ठाकरे यांच्या पिढ्या नाजूक वळणावर उभ्या आहेत. मुंबई महापालिका हा ठाकरे यांचा प्राण मानला जातो आणि या महापालिकेतील सत्ता जाते की राहते अशी अस्तित्वाची, परीक्षेची वेळ समोर असलेने ठाकरे बंधू एकमेकांना टाळ्या देत गाठीभेटी घेत आहेत आणि दसरा मेळाव्यात शिवसेना उबाठा व मनसे म्हणजे राज ठाकरे यांची युती होणार अशी अटकळ बांधली जाते आहे.

ब्रँड टिकवण्यास, अस्तित्व राखण्यासाठी त्याशिवाय दोन्ही बंधूंना पर्याय उरलेला नाही. अलीकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकीत उध्दव ठाकरे व राज ठाकरे एकमेकांबद्दल कसे बोलत होते व राज ठाकरे यांचा मुलगा अमित ठाकरे कसे पराभूत झाले हे महाराष्ट्र विसरलेला नाही. पण आता कोणताच इलाज उरलेला नाही म्हणून हे दोघे ठाकरे बंधू ब्रँड वाचवण्यासाठी एकत्र येत आहेत. दसरा मेळाव्यात किंवा त्यानंतर निवडणूका जाहीर झाल्यानंतर त्यावेळचे फायदे तोटे, जागा, वगैरे लक्षात घेऊन युतीचा अंतिम निर्णय होईल, पण विलीनीकरण होणार नाही असे दिसते आहे. युती होणार असे गृहीत धरुन शिवसैनिक आणि मनसैनिक काही ठिकाणी हातात हात घेताना दिसत आहेत. राज आणि उद्धव ठाकरे एकमेकांना चांगले ओळखून आहेत. त्यामुळे दोघेही सावध पावले टाकत आहेत. ते स्वाभाविक आहे व योग्यही आहे. दोघे एकमेकांच्या घरी जाणे, भोजन, पार्ट्या करणे, वगैरे वगैरे पावले पडत आहेत कारण दोघांच्या राजकीय अस्तित्वाचीच लढाई समोर ठाकली आहे.

गेल्या काही वर्षांत राज ठाकरे यांनी आपल्या राजकीय भूमिका सतत बदलत्या, उलट सुलट घेतल्या पण त्यांना अपेक्षित यश आलेले नाही. 'एकदा महाराष्ट्र माझ्या हाती सोपवा आणि बघा' या त्यांच्या आवाहनाला टाळ्या मिळत राहिल्या पण समर्थन कधीही मिळाले नाही तर दुसरीकडे शिवसेना उबाठा दिसामाजी शक्तिहिन होते आहे. उपराष्ट्रपती निवडणुकीत जी मते फुटली ती महाराष्ट्रातील आणि ठाकरे, शरद पवार तंबुतील असे सांगितले जाते आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी आहे. या महानगरीचा लौकिक आगळा वेगळा आहे. उद्धव ठाकरे यांनीही मुख्यमंत्रीपदासाठी जनमताचा कौल डावलून शरद पवार व राहुल गांधी यांच्याशी हातमिळवणी केली. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना खुर्ची मिळाली पण पाठीराखे निघून गेले. भाजपाला केंद्रात पूर्ण बहुमत नव्हते. त्यांना मित्रांना सोबत घेऊन सत्ता राखायची होती. त्यामुळे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस फुटीला भाजपाचे प्रोत्साहन होते व आहे. या सर्व पार्श्वभूमीवर दोन्ही भाऊ एकत्र येणार असे वातावरण आहे पण एकत्र येऊनही ते मुंबई महापालिका जिंकणार का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ब्रँड सत्तेत राखणे ही ठाकरेंची गरज आहे, मुंबईची गरज आहे का? हे महापालिका निवडणुकीनंतर कळेल. दसरा मेळाव्यात राज–उद्धव युतीची घोषणा झाली तर राज्यातील महाआघाडी आणि देशातील इंडीया गठबंधन संघटीत राहणार का? हा नवा प्रश्न आहे. राज ठाकरे यांच्या परप्रांतीयांबद्दलच्या भूमिका आणि अल्पसंख्याकांबद्दलचे धोरण काँग्रेस व अन्य घटक पक्षांना परवडेल असे वाटत नाही. काँग्रेसने उद्धव ठाकरे यांचा शरद पवारांसोबत हवा तसा वापर करुन घेतला आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार, भूमिका सोडून उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदासाठी काँग्रेसला मिठी मारली, असा त्यांच्यावर आरोप आहे.

देशातील घराणेशाही संपवायची असाही एक कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपाचा आहे. वारंवार ते बोलून दाखवतात. शिवसेना, मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट हे राजकीय पक्ष दिसत असले तरी ते पक्ष काही घराण्यांमार्फत चालवले जतात. मुंबई महापालिका निवडणूक ही ठाकरे ब्रँडला नामोहरण करण्यासाठी संधी आहे तर ही निवडणूक ठाकरे यांच्या राजकीय अस्तित्वाची कसोटी ठरणारी आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष असणार आणि ही निवडणूक निकराने लढवली जाणार, हे स्पष्ट आहे. ठाकरे ब्रँड वाचवण्यासाठी सुरु असलेल्या या प्रयत्नात कितपत यश येते, हे बघावे लागेल.

## तिरट खेळणारे तिघे पोलिसांच्या ताब्यात; अडीच लाखाचा मुद्देमाल जप्त

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई शहरातील धनगर वाडा गोविंद नगर भागात पोलिसांनी तिघांना तिरट खेळताना रंगेहात पकडून त्यांच्याकडून अडीच लाखाचा मुद्देमाल जप्त केला पोलिसांनी या तिघांनाही ताब्यात घेतले आहे.**

दिनांक १२ सप्टेंबर रोजी गोपनीय माहीती मिळाली कि, धनगरवाडा गोविंद नगर अंबाजोगाई येथे काही ईसम हे पत्यावर पैसे लावुन तिर्रट नावाचा जुगार खेळ खेळत आहेत व खेळवित आहे अशा गोपनिय माहीती वरुन सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक, अंबाजोगाई यांचे आदेशाने माहितीचे ठिकाणी जावुन छापा मारला असता त्या ठिकाणी गोलाकार पध्दतीमध्ये ३ ईसम नामे अन्वर हुसेन शहा वय ४० वर्षे, रा. बागवानगल्ली अंबाजोगाई, खंडु लिबांजी चौरे वय ४० वर्षे, रा. बागवानगल्ली अंबाजोगाई, शेख वसीम शेख मन्नु वय ३८ वर्षे, रा. रविवारपेठ भोईगल्ली अंबाजोगाई हे गोलाकार पध्दतीने बसुन तिर्रट नावाचा जुगार खेळ खेळतांना व खेळवित असताना मिळुन आले त्यांचे ताब्यातुन तिर्रट जुगाराचे साहित्य व नगदी ९४००/- रुपायाची रोख रक्कम, मोबाईल फोन व मोटार सायकल किमंत अंदाजे २,४०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल असा एकुन २,४९,४००/- रुपायाचा मुद्देमाल जप्त करुन त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन स्टेशन अंबाजोगाई शहर येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४५५/२०२५ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि शरद जोगदंड, सपोनि घुगे, पोलीस कर्मचारी अमोल गायकवाड, नाजिम शेख, मंगेश भोले, हनुमंत लाड, भागवत नागरगोजे, यांनी केली असुन पुढील तपास पोलीस हवालदार अमोल गायकवाड करत आहेत.

## भास्कर दानवे यांची पालकमंत्री यांच्यासोबत विकासकामा संदर्भात चर्चा

**जालना । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी दि.१२ सप्टेंबर रोजी मुंबई येथे जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. श्रीमती पंकजाताई मुंडे यांची भेट घेत विकासकामा संदर्भात चर्चा केली.**

या भेटीत जालना विधानसभा मतदारसंघातील विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान जिल्ह्यातील मूलभूत सुविधा, स्थानिक नागरिकांच्या गरजा, सुरू असलेले व अपूर्ण प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. विशेषतः रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, आरोग्य, शिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत चर्चा झाली. या संदर्भात दानवे यांनी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे आवश्यक निधीची तरतूद करून द्यावी, अशी विशेष मागणी केली. नागरिकांना अपेक्षित सुविधा त्वरित मिळाव्यात यासाठी सरकारच्या स्तरावर योग्य ती पावले उचलली जातील, अशी हमी पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्याचे समजते.

## पत्नीची खून करुण पती झाला पसार

**परळी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील डाबी गावात सकाळी दूधवाला दूध देण्यासाठी आला. मात्र त्याला दूध घेण्यासाठी कोणीच आले नाही. त्याच्या आवाजाने बाजूच्या रूम मधे असलेले मूल झोपेतून उठली आणि घरात गेली असता हा सर्व प्रकार समोर आला. त्या मुलांची आई रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसल्याने आरडा ओरड सुरु झाली त्यामुळे सारा गाव गोळा झाला आरोपी पती मात्र फरार झाला त्याच्या अटकेसाठी मयताच्या कुटूंबियांनी एकाच आक्रोश केला.**

शोभा तुकाराम मुंडे (वय ३७ वर्षे) असे मयत महिलेचे नाव समोर येत आहे. तत्काळ घटनेची माहिति परळी येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात देण्यात आली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घेऊन जाण्यासाठी पोलिसांनी रूग्णवाहिका मागवली पण नातेवाईकांनी मृतदेह उचलू देणार नसल्याचं म्हटलं होतं. कारण शोभा हिचा पती तुकाराम यानेच त्याच्या पत्नीचा निघृणपणे खून करून फरार झाला असल्याचे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले.आरोपी पतीला ताब्यात घेतले जात नाही तोवर नातेवाईकांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घेऊन जाण्यासाठी नकार दिला. मयत शोभा तुकाराम मुंडे (वय ३७ वर्षे) ही गावात मोलमजुरी करून आपला संसार चालवत होती. तुकाराम याला दारूचे व्यसन होते आणि यावरून देखील त्याच्यात भांडणे होत असायची. त्यांनी मागचा राग मनात धरून आमच्या मुलीचा घात केला असा आरोप आता नातेवाईकांनी केला आहे.

## पान ६ वरून...

### हैदराबाद गॅझेटीअरनुसार

महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी मागील तीस पस्तीस वर्षांपासून वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन करुन राज्य सरकारकडे मागणी केली गेली आहे, परंतु दुर्दैवाने सरकारने समाजाच्या न्यायिक व संविधानीक मागणीला केराची टोपली दाखवली आहे.सरकारच्या या आडमुठ्या धोरणामुळे बंजारा समाजात प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.त्याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील समस्त बंजारा समाजाच्या वतीने सोमवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.सकाळी अकरा वाजता जुने बीड भागातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात होईल व जिल्हाधिकारी कार्यालयावर सभेने समारोप होणार आहे. तरी समाजातील आजी माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, महिला,युवक,विद्यार्थी, कर्मचारी,ऊसतोड मजूर, मुकादम,विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षांचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बंजारा समाजाची संघटित ताकद दाखवून द्यावी,असे आवाहन राष्ट्रीय बंजारा राजकीय परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संत सेवालाल महाराज बंजारा/ लबाणा तांडा समृद्धी योजनेचे अशासकीय सदस्य प्रा.पी.टी. चव्हाण यांनी केले आहे.

---------

### मातंग समाजाचे आमरण

येथे खुलेआम फिरत आहे. अनुसूचित जमाती अत्यचार प्रतिबंध अधिक १९८९ चे कलम ३(२) (आर), ३(१) (एस) यासारख्या गुःग्रामध्ये सदर अटक करण्यास पोलीस प्रशासन टाळाटाळ करत आहे. नमुद आरोपीस अटक नाही केल्याने याकरीता आम्हास नाविलाजाने अमरण उपोषणाला बसण्याची गरज निर्माण झाली आहे.आज दिं.१३/०९/२०२५ रोजी तलवाडा येथील नवीन बसस्टॅन्ड समोर, लोकशाहीर डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या समोर परिसारामध्ये सकल मार्तंग समजाच्या वतीने आमरण उपोषणाला बसले आहेत आम्ही तीन्ही उपोषनकरत्यास जास्तीचा तनाव झाल्याने फिट येते. सदर उपोषण करतांना आमच्या जिवाचे काही बरे वाईट झाल्यास त्यांचे जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील असे नमुद निवेदनात केले आहे

---------

### कलाकार–रसिकांची रेंज जुळली

ही कलाकृती प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेली. नाटकातील प्रत्येक पात्राने स्वतःची छाप सोडली. काहींनी हसवले, काहींनी रडवले, काहींनी विचार करायला लावले पण अखेरीस सर्वांनी अंतर्मनाला भिडणारा ठसा उमटविला. रसिकांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या नाटकाचे खरे यश ठरले. नाटकाचे सहाय्यक दिग्दर्शक रोहित पुराणिक आणि निर्मिती सूत्रधार प्रतीक कांबळे यांनी या कलाकृतीला भक्कम पाया दिला. संगीत, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या प्रामाणिक मेहनतीमुळे हे नाटक केवळ प्रयोग न राहता रसिकांच्या मनाचा सोहळा ठरले. एकंदरित ''रेंज पाहिजे'' हे नाटक बीडच्या रंगभूमीच्या नव्या पर्वाची जोरदार सुरूवात ठरले आहे. रेंज पाहिजे या नाट्यप्रयोगाचे उदघाटन जेष्ठ कलावंत भरत अण्णा लोळगे, दै. पार्श्वभूमीचे संपादक गंमतभाऊ भंडारी, दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोषजी मानूरकर, जेष्ठ रंगकर्मी डॉ उज्वला वनवे, शिक्षक प्रेरक वैद्य सर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक आणि हेवन व्हेज रेस्टोरंटचे संचालक तनय शेळके यांनी रंगमंचाचे विधिवत पूजन करून केले व कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

---------

### वैद्यकीय अधीक्षकपदी

होत्या.आता त्यांची शासकीय स्तरावर बदली झाली असून त्यांचे जागी रायगड येथून डॉ.सुरेश साबळे यांना नियुक्ती देण्यात आली आहे. डॉ.सुरेश साबळे हे यापूर्वी देखील माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी ते वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत होते त्यांचा कार्यकाळ येथे उत्कृष्ट राहिलेला असून त्यांच्या काळातच या रुग्णालयात एका महिन्यात साडेचारशे महिलांच्या सिजर शस्त्रक्रिया झाल्या होत्या, त्याचप्रमाणे विविध राष्ट्रीय कार्यक्रम राबवून त्यांनी माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे नाव उंचावले होते.कोरोना काळात देखील त्यांनी उत्कृष्ट असे कार्य करून अनेक कोरोना रुग्णांचे जीव वाचवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यानंतर साबळे यांची बीड जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून नियुक्ती झाली होती त्या काळात त्यांनी उत्कृष्ट असे कार्य करून एक वेगळी शिस्त जिल्हा रुग्णालयात लावली होती त्यामुळे आजही त्यांचे जिल्हा भरात उत्कृष्ट प्रशासक म्हणून नाव आहे. मात्र बीड येथेच असताना काही राजकीय व्यक्तींनी त्यांच्या कार्यात खोडा घालून त्यांची रायगड येथे बदली करण्यात आली होती.आता त्यांची आरोग्य विभागाचे उपसचिव दीपक केंद्रे यांनी दिनांक दहा रोजी एक आदेश काढून त्या अन्वये माजलगाव येथे डॉ.साबळे यांची नियुक्ती केली आहे, त्या बद्दल सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

---------

### पाटोद्यात करोडो रुपयांची पंचायत

कोणता विकास साधत आहेत? पाटोद्याच्या जनतेचे प्रश्न सोडविण्याऐवजी निधी धुळ खात पडू देणे, हा दुरदृष्टीचा भाग आहे का बेफिकिरीचा?याबाबत प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. परिणामी, नागरिकांत प्रचंड संताप निर्माण झाला आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी याविषयी गंभीर भूमिका घेत तातडीने इमारत सुरू न केल्यास मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेल्या इमारती वाया जाणे थांबवायचे असेल, तर जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी यांनी तातडीने जबाबदारी स्वीकारून इमारत जनतेसाठी खुली करावी. अन्यथा या निष्क्रियते विरोधात नागरिक रस्त्यावर उतरतील असा इशारा सामाजिक कार्यकर्ते यांनी दिला आहे.

---------

### संभाजीनगर येथे राज्यस्तरीय

राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कार्याध्यक्ष काटकर ,सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे ,कोषाध्यक्ष शेख मन्सूर भाई ,डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी तीन वाजता राज्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी होणार आहे. या अधिवेशनाला आणि बैठकीला उपस्थित राहणे पदाधिकाऱ्यांना अनिवार्य आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले आहे.

---------

### जि.प.च्या आरोग्य

कामचुकारपणा वाढला बीड जिल्हा परिषदेच्या अनेक विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये कामचुकारपणा आणि मग्रुरी वाढली आहे. शिक्षण आणि आरोग्य या मोठी आस्थापना असलेल्या विभागासह अन्य विभागातील अनेक कर्मचारी हे वेळेवर कार्यालयात येत नाहीत आणि आलेच तर कार्यालयात बसत नाहीत. अशी स्थिती आहे. कार्यालयीन प्रमुखाचेही या कर्मचाऱ्याकडे दुर्लक्ष असते. याप्रकरणी दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

-----------

### वडवणी तालुक्यातील

देताना संदीप माने रामदास भाई ढगे व इतर माजी पदाधिकारी उपस्थित होते पुढील प्रमाणे नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत बालासाहेब बादाडे ( उपतालुका प्रमुख), प्रकाश पवार (उपतालुकाप्रमुख) , प्रताप मात्रे (उपतालुकाप्रमुख ) , महादेव मस्के (तालुका सचिव) , शिवाजी सावंत (तालुका समन्वयक ) , बालासाहेब शेंडगे( तालुका संघटक ) बाळनाथ घाटुळ (उपळी जिल्हा परिषद सर्कल प्रमुख), कृष्णा कोळपे ( उपळी पंचायत समिती प्रमुख) ,ज्ञानेश्वर मोरे ( कवडगांव पंचायत समिती प्रमुख), आनंत देवडकर ( कवडगांव पंचायत समिती उपप्रमुख), राजेभाऊ कदम (जिल्हा परिषद सर्कल प्रमुख चिखलबीड सर्कल ), सिद्धेश्वर ताटे ( चिखलबीड पंचायत प्रमुख ),गोरख चव्हाण (चिखलबीड पंचायत समिती, उपप्रमुख),अशोक राठोड( चिंचवन पंचायत समितप्रमुख),शिवाजी चव्हाण (चिंचवन पंचायत समिती उपप्रमुख) करण शिंदे उपशहरप्रमुख वडवणी शहर वरील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप व तालुकाप्रमुख माऊली गोंडे, रामदास भाई ढगे संदिप माने यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

---------

### उपोषणाची चेतावणी

राज पाटील यांनी प्रकाश दादा सोळंके यांचे आभार मानले आहे. वडवणी तालुक्यातील कुंडलिका नदीवर असलेला अप्पर कुंडलिका प्रकल्प या वर्षी लवकरच भरलेला आहे. हे धरण ओसंडून वाहत असल्यामुळे या धरणाचे पाणी कालव्याद्वारे मामला चिंचोटी आणि तीगाव येथील तलावामध्ये सोडण्यात यावे अशी मागणी ऍड राज पाटील यांनी पाटबंधारे विभागाकडे अनेक वेळा केली होती. याबाबत पाणी सोडले नाही तर १७ सप्टेंबर पासून उपोषण करण्यात येईल असा इशारा देखील दिला होता. राज पाटील यांनी माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय नेते आ. प्रकाश दादा सोळंके साहेब यांच्या कडे देखील निवेदन देऊन याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली होती. आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी राज पाटील यांना पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार प्रकाशदादांनी प्रशासकीय पातळीवर दूरध्वनी करून आणि पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. त्यामुळे दिनांक १२ सप्टेंबर रोजी अप्पर कुंडलिका धरणाचे पाणी मामला आणि चिंचोटी धरणात सोडण्यात आले. तीगाव धरणात देखील पाणी सोडण्यात येणार आहे. राज पाटील यांनी ही मागणी लावून धरल्यामुळे आणि प्रकाश दादा सोळंके यांनी या मागणीचा पाठपुरावा केल्यामुळे प्रशासनाने हे पाणी सोडले आहे. त्यामुळे जनतेमधून एडवोकेट राज पाटील आणि विकासप्रिय नेतृत्व आमदार प्रकाश दादा सोळंके यांचे आभार मानले जात आहे.

**पाणी सोडण्याचे पूर्ण श्रेय आमदार दादांना**

एडवोकेट राज पाटील यांनी अप्पर कुंडलिकाचे पाणी तीगाव चिंचोटी मामला तलावात सोडण्यासाठी निवेदन देऊन उपोषणाचा इशारा दिला होता. शुक्रवारी पाणी सोडण्यात आल्यानंतर प्रतिक्रिया देताना एडवोकेट राज पाटील यांनी सांगितले की हे पाणी सोडण्याचे पूर्ण श्रेय माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय नेते आमदार प्रकाश दादा सोळंके यांना देत आहे. कारण प्रकाश दादांकडे मी मागणी केल्यानंतर त्यांनी तत्काळ प्रशासनाला दुरध्वनी वरुन सूचना दिल्या होत्या एवढेच नाही तर त्यांनी लेखी पत्र व्यवहार देखील पाणी सोडण्यासंदर्भात केला होता. त्यामुळे हे पाणी सोडण्याचे पूर्ण श्रेय मी आमचे लोकप्रिय नेते आ. प्रकाश दादा सोळंके यांना देत आहे.

------------

## पान १ वरून...

### १ ऑक्टोबरपासून उसाचा

नवीन हंगामात देशातील साखरेचा वापर २८.५ ते २९ दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे, जो या वर्षी २८ दशलक्ष मेट्रिक टन होता. भारत नवीन विपणन वर्षाची सुरुवात ५ दशलक्ष मेट्रिक टनांच्या सुरुवातीच्या साठ्याने करेल, जो या वर्षाच्या सुरुवातीला ८ दशलक्ष मेट्रिक टन होता.

--------

### ३२ टक्के आरक्षणातील सर्व

असेल आणि त्या क्षेत्रातून सुद्धा जर असे प्रश्न विचारले जात असतील, तर हे वेदनादायी आहे. आमचा समाजच तेवढा शिल्लक आहे त्यामुळे १० टक्के आमच्या संख्येनुसार पुरत नाही. ओबीसीत असून सुद्धा संख्येने आम्ही संपूर्ण राज्यात ५० /५५ टक्के आहोत. या समाजाला दहा टक्के आरक्षण कसं पुरेल? त्यामुळे तुम्हाला दोन–तीन प्रकारचे आरक्षण आहे असे म्हणणे नेत्यांना शोभत नसल्याचे जरांगे पाटील म्हणाले आहेत. जालना जिल्हा परिषद अध्यक्षपद ओबीसीसाठी राखीव सुटले यावर बोलताना ते म्हणाले की, अजून मिळाले तरी कुठे आम्हाला आरक्षण.? छगन भुजबळांना फक्त तेवढाच नाद आहे राजकारण एके राजकारण, अशी टीका पाटलांनी केली. हायकोर्टात आरक्षण सुनावणी सुरू झाली आहे यावर बोलताना ते म्हणाले की, आमचे १० टक्के आरक्षण ५० टक्क्यांच्या आतील ओबीसी आरक्षणात घ्या, अशी आमची मागणी आहे. ५० टक्क्यांवरील आरक्षण टिकत नाही. आमच्या हक्काचं आरक्षण आम्हाला पाहिजे, असे जरांगे म्हणाले.

---------

### आदिवासीतून आरक्षण दिल्यास

आदिवासी बनण्यासाठी आदिवासींच्या पोटी जन्म घ्यावा लागतो. बंजारा समाजाने कितीही आंदोलने केली तरी आम्ही त्यांना आदिवासींमध्ये येऊ देणार नाही. महाराष्ट्रात आदिवासींमध्ये कोणालाही घुसू देणार नाही, असे पाडवी म्हणाले. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारला ब्लॅकमेल करणे बंद करा. आदिवासी समाजातून धनगर समाजाने देखील आरक्षणाची मागणी केली होती. त्यावेळेस आम्ही समाजाच्यावतीने कायद्याची लढाई लढलो आणि जिंकलो. अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी काही निकष असतात. हे निकष आम्ही ठरवले नसून राज्यघटनेने ठरवलेले निकष आहेत, असे ते म्हणाले. बंजारा समाज हा या निकषात बसत नसल्यामुळे आजपर्यंत समाजाचा अनुसूचित जमातीच्या आरक्षण यादीत समावेश करण्यात आलेला नाही. बंजारा समाजाला विमुक्त जाती 'अ' मध्ये ३ टक्के आरक्षण असून आणि विमुक्त–भटक्या जमाती अ, ब, क, ड हे चार घटक मिळून बंजारा समाजाला ११ टक्के आरक्षण आहे.

----------

### अल्पवयीन मुलीचे अपहरण करणारा

त्यानंतर पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम व त्यांचे सहकारी पोहे. चंद्रकांत काळकुटे, पोना. किशोर गोरे आणि महिला पोलिस कॉन्स्टेबल जयश्री भालेराव तेलंगणाच्या दिशेने रवाना झाले. तेलंगणात पोहोचल्या नंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्यांनी पत्ता शोधला. त्यावेळी संशयित हर्षद बालाजी जाधवर आणि ती अल्पवयीन मुलगी हे तेलंगणा राज्यातील खम्मम जिल्ह्यातील मोडीगोंडा येथे एका फरशीच्या कारखान्यात काम करीत असल्याची माहिती मिळाली. त्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन केज पोलिस ठाण्यात आणले. त्या नंतर हर्षद जाधवर याच्यावर बलात्कार आणि पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा तपास आता पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपी हर्षद जाधवर याला न्यायालयासमोर हजर केले असता त्याला १५ सप्टेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली असून पीडित मुलीची रवानगी सुधार गृहात करण्यात आली आहे.

**मुलीच्या वडिलांनी केला होता आत्महत्येचा प्रयत्न**

मुलीच्या अपहरणाच्या नैराश्यातून मुलीच्या वडिलांनी दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी ३:०० च्या सुमारास विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. यानंतर पोलिसांनी तपासाची गती आणखी वाढविली आणि अखेर त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

-----------

### अंमळनेर ते बीड रेल्वे मार्गावर आजपासून

मदत करतील. यासाठी अमळनेर–बीड विभागातील रेल्वे ट्रॅकजवळ राहणाऱ्या रहिवाशांना आणि जनतेला या ट्रायल रनच्या दिवसांमध्ये सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मार्गावर कुठेही ट्रॅकजवळ बसू नका. रेल्वे मालमत्तेवर किंवा ट्रॅकवर अतिक्रमण करू नका. अधिकृत लेव्हल क्रॉसिंग किंवा ओव्हरब्रिज वगळता रुळांवरून चालणे किंवा ओलांडणे टाळा. शेतकऱ्यांना गुरेढोरे किंवा इतर पशुधन रुळाजवळ किंवा पलीकडे सोडू नका, असा सल्ला देण्यात येत आहे. पालकांना विनंती आहे की त्यांनी मुलांना रेल्वे रुळांपासून दूर राहण्यास मार्गदर्शन करावे. चाचणी टप्पा सुरळीत आणि सुरक्षितपणे पार पडावा असे आवाहन रेल्वे विभागाने केले आहे. त्यामुळे आता अहिल्यानगर ते बीड रेल्वे सुरू होणार आहे. ही रेल्वे डिझेलवर आधारित चालणार असल्याने ही चाचणी घेण्यात येत आहे.

-----------

### लक्ष्मण हाकेंनी अक्रस्ताळेपणा

विषयावर बोलताना लक्ष्मण हाके यांच्या बीड दौऱ्यावरही त्यांनी भाष्य केले. कोणी कोणाला विरोध करावा हा लोकशाहीत ज्याचा त्याचा प्रश्न आहे. आपापली बाजू मांडण्याचे काम नक्कीच केले पाहिजे. मात्र, हे करत असताना भाषा चुकीच्या पद्धतीने वापरली जात आहे. बंजारा समाजाच्या एसटी प्रवर्गाच्या मागणीला मी पाठिंबा दिला आहे. इतर कोणी मागणी केली तर त्यांना देखील पाठिंबा देणार आहे, असे आमदार सुरेश धस यांनी म्हटले.

-------

### मारहाण करत बीडमधुन

गोरे वस्ती परिसरातून नागनाथ नन्नवरे या तरूणास दहा ते बारा लोकांच्या टोळक्याने मारहाण करत फरफटत नेत अपहरण केल्याचा व्हिडिओ आज सकाळी सोशल मिडीयावर व्हायरल झाला अन् पुन्हा एकदा बीड जिल्ह्यात खळबळ उडाली. सदरची घटना घडल्यानंतर नन्नवरे यांच्या पत्नी दिया नन्नवरे यांनी तात्काळ बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तीन व्यक्तींसह अन्य अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस प्रशासनाने तातडीने तपास सुरू केला असून आरोपींचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू असतांना हे आरोपी भूम तालुक्यात असल्याचे पोलिसांना समजल्यानंतर अंबी पोलीस ठाणे हद्दीत आज पहाटे दहा जणांना बीड पोलिसांनी ताब्यात घेतले. यामध्ये एक महिलेचा समावेश आहे. प्राथमिक चौकशीत दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यामागे दिया नन्नवरे यांच्या पहिल्या पतीचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, अद्याप हल्ल्याची नेमकी कारणे स्पष्ट झालेली नाहीत. गोरे वस्ती परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिक या घटनेमुळे घाबरले आहेत.

----------

### ७० हजार मराठा विद्यार्थ्यांची

आहे. महासंघाने निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांना निवेदन दिले. यावेळी वसंतराव मुळीक, शैलजा भोसले आदी उपस्थित होते. मुळीक यांनी सांगितले की, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होईल आणि त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागेल. महासंघाने सरकारला इशारा दिला आहे की, १५ दिवसांच्या आत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू.

------------

### कराडच्या कुटुंबीयांना

आ.धनंजय मुंडे यांनी एका पत्राद्वारे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना केली आहे. धनंजय मुंडे यांनी आपल्या सोशल मिडिया अकाऊंटवरुन याबाबतचे पत्र शेअर केले असून, दोन दिवसांपूर्वी मंत्री छगन भुजबळ यांच्यासोबत त्यांनी कराड कुटुंबीयांची भेट घेतली होती आणि त्या कुटुंबाला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन देखील दिले होते. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे ही मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ही मागणी केली. दरम्यान, स्व. भरत कराड यांच्या पश्चात कुटुंबात आई–वडील, पत्नी, भाऊ, तीन मुली व एक मुलगा असा मोठा परिवार असून त्यांच्या या बलिदानाने उघड्यावर पडलेल्या या कुटुंबाला राज्य सरकार न्याय देईल, असा विश्वासही धनंजय मुंडेंनी व्यक्त केला आहे.

--------------

### ..तर शासकीय कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यालयीन प्रमुखांकडून शिस्तभंगाची कारवाई शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. दरम्यान, यापूर्वीही शासनाने ७ मे २०२४ रोजी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत ओळखपत्र दर्शनी भागावर लावावे, अशा सूचना दिल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात या नियमाचे पालन होत नसल्यामुळे अनेक तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. नागरिकांना शासकीय कार्यालयात अधिकारी किंवा कर्मचारी ओळखणे कठीण जात होते. त्यामुळे कामकाजात अडथळे निर्माण होत होते. नागरिक जेव्हा शासकीय कार्यालयात आपल्या कामासाठी जातात, तेव्हा त्यांना संबंधित अधिकारी किवा कर्मचाऱ्यांची ओळख सहज पटावी, यासाठी ही अट घालण्यात आली आहे.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. १४ सप्टेंबर २०२५

३

## अंबाजोगाई येथे माविमचा महिला मेळावा उत्साहात

बीड । प्रतिनिधी

दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी स्व. विलासरावजी देशमुख सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत अंबाजोगाई लोकसंचलित साधन केंद्राची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा सी.एम.आर.सी.च्या सचिव रहिमुन्निसा बहादूरखा पठाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमास महिला आर्थिक विकास महामंडळाचे विभागीय सल्लागार संदीप मराठे, विभागीय व्यवसाय विकास सल्लागार उत्कर्ष भोळे, महिला व बाल विकास विभागातील सखी वन स्टॉप सेंटरच्या श्रीमती खांडेकर, चे संतोष पाटील व नारायण बंडे बँकेचे प्रतिनिधी, तसेच माविम जिल्हा धकार्यालयाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप, लेखा अधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदुरकर, सल्लागार नरेश कुरापाटी, सी.एम.आर.सी. सचिव, लेखापाल, उपजीविका सल्लागार, सहयोगिनी व कार्यकारीनी सदस्य मंडळ उपस्थित होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक संदिप मराठे व मंचावरील उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि माता रमाई यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागत व प्रस्तावना व्यवस्थापक मिना कांबळे यांनी केली. वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल लेखापाल स्वप्रील वाघमारे यांनी सादर केले.या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक संदीप मराठे यांनी शासकीय योजनांची माहिती दिली तर उत्कर्ष भोळे यांनी कृषि व पशुपालनाशी संबंधित योजनांची माहिती दिली.

# तलावाचे भूसंपादन जलद गतीने करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

## आ.धस यांच्या उपस्थितीत आष्टी मतदार संघातील विविध विकास प्रकल्पांबाबत आढावा बैठक





बीड । प्रतिनिधी

**आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास प्रकल्पांसाठी भूसंपादन, जलसिंचन प्रकल्प, रस्ते, वनीकरण आणि इतर महत्त्वाचे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.**

येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास विषयांच्या आढावा बैठकीत आष्टी विधानसभा मतदार संघाचे आमदार सुरेश धस, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (रोहयो) प्रभोदय मुळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, अधिक्षक अभियंता शिंगाडे, कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी, उपविभागीय अधिकारी, बीड कविता जाधव, उपविभागीय अधिकारी, पाटोदा वशिमा शेख, वनपरिक्षेत्र अधिकारी, अमोल गरकल तसेच सर्व संबंधित विभागाचे अधिकारी आदींची उपस्थिती होती. यावेळी बैठकीत आष्टी मतदार संघातील विविध महत्त्वाच्या विकास प्रकल्प प्रशासनाच्या दृष्टीने हे सर्व प्रकल्प स्थानिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून सर्व संबंधीत विभागांनी आपले प्रस्ताव तात्काळ सादर करुन त्यास मंजूरी करुन कामे पूर्ण करण्यात यावे. तसेच संबधीत विभागाने यासाठी त्वरित बैठकीचे आयोजन केले आहे आणि तक्रारींचे निराकरण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी दिल्या. आमदार सुरेश धस आष्टी, पाटोदा, शिरूर (का) मतदार संघात जी विविध विकास कामे सुरु आहेत त्या कामास संबंधीत विभागांनी तात्काळ निर्णय घेवून कामे सुरु करावीत. तसेच ज्या कामात काही अडचण असल्यास जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार ती सोडवून तात्काळ मार्गी लावावीत. मतदार संघातील विविध प्रकल्पांमुळे परिसरातील पाणी व्यवस्थापनात सुधारणा होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना सिंचन सुविधाही उपलब्ध होणार आहे. याकरीता आष्टी मतदार संघातील विविध अपूर्ण भूसंपादन प्रकियेसाठी प्रशासनाने तातडीने मार्गी लावाव्यात. प्रशासनाने यासंबंधी योग्य नियोजन करून या विकास प्रकल्पास गती द्यावी. या विकासकामामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होणार असल्याचे ते म्हणाले. आष्टी मतदार संघातील कृष्णा मराठवाडा प्रकल्प उपसा सिंचन योजना क्रं. ०३ अंतर्गत खुंटेफळ साठवण तलावासाठी भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे. तसेच सिंदफणा मध्यम प्रकल्पाची उंची वाढवण्यासाठी अतिरिक्त भूसंपादन. सिंदफणा व्हयाली अंतर्गत मदमापुरी, उखळवाड आणि पांगरी साठवण तलावांच्या प्रलंबित भूसंपादन प्रक्रियेला गती देणे. तसेच आष्टी, पाटोदा आणि शिरुर कासार या क्षेत्रांतील महसूल विभाग, जिल्हा परिषद आणि वन विभागाच्या ताब्यातील जमिनी नगरपंचायतींना हस्तांतरणांची प्रक्रिया. नायगाव मयूर अभयारण्य क्षेत्रात गॅरीसिडिया वृक्षांचे समूळ उच्चाटन करून, त्या ठिकाणी परंपरागत देशी औषधी आणि वनवृक्षांची लागवड करणे. पैठण-पंढरपूर रा.मा. २७२ ई प्रकल्पाच्या बंद असलेल्या कामांसाठी शेतकऱ्यांच्या मावेजा वाटप. शिरुर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसानीसाठी विमा कंपन्यांकडून मिळालेल्या विमा रकमांवर तक्रारी. ग्रामपंचायत निमगाव मायंबा अंतर्गत लमाण तांडा क्रं. ०१ आणि ०२ यांच्यासाठी स्वतंत्र महसूली सजा प्रस्तावाबाबत निर्णय. पाटोदा तालूक्यातील सौताडा येथे पवन ऊर्जा प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनींच्या पुनर्स्थापना. यामुळे श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड सावरगाव घाट येथे देवस्थान परिसराच्या विकासावर प्रतिबंध लागू करणे आदी विषयांवर यावेळी बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार सुरेश धस यांनी मांडलेल्या समस्या ऐकून घेत आणि त्यावर विचारविनिमय करून योग्य ती कारवाई करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. यावेळी बैठकीस आष्टी मतदार संघातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ब्रम्हगावात आयुष्मान कार्डचे वाटप



अनिलराधे मित्र मंडळाचा उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यातील जनतेकरिता मोफत पाच लाख रूपयांच्या उपचारासाठी गरजेचे असलेल्या आयुष्मान कार्डचा कॅम्प घेवुन त्याचे वाटप दि.१२ सप्टेंबर रोजी ब्रम्हगावात उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचा मुलगा साम्राज्य अनिल कांबळे याच्या वाढदिवसानिमीत्त करण्यात आले.

शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथील अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने विवीध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते तर महापुरूष जयंती, पुण्यतिथी देखिल साज-या केल्या जातात. उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचा मुलगा साम्राज्य अनिल कांबळे याच्या व्दितीय वाढदिवसानिमीत्त हार, तुरे, केक व इतर खर्चाला फाटा घेत गावातील सर्व ग्रामस्थांकरिता आयुष्यमान कार्ड काढण्याकरिता ऑनलाईन कॅम्प घेवुन ग्रामस्थांना तात्काळ कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचेसह विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, श्याम कांबळे, शरद कांबळे, यवराज कांबळे, प्रविण कांबळे, अविनाश कांबळे, तात्यासाहेब कांबळे, सागर कांबळे, सिध्देश्वर कांबळे, मयूर कांबळे यांचेसह ग्रामस्थांची उपस्थिती होती. दरम्यान आयुष्यमान कार्ड मिळाल्यामुळे ग्रामस्थांच्या चेह-यावर समाधान दिसुन आले तर त्यांना मिळालेल्या आयुष्यमान कार्डमुळे उपचार मिळणे सोपे झाले आहे.

## स्वराज्यझेप प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे प्रतिवर्षा प्रमाणे (वर्ष ४ थे) येथील स्वराज्यझेप प्रतिष्ठानच्या वतीने उद्या दि.१५/०९/२०२५ सोमवार रोजी सकाळी १० वा.गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन केले असून या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील ग्रामस्थ,पालक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक स्वराज्यझेप प्रतिष्ठान व समस्त पिंपळवंडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.वसिमा शेख मॅडम,उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे यावेळी प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी.तसेच प्रमुख उपस्थिती परमेश्वर सातपुते सर (उ.बा. ठाकरे शिवसेना जिल्हा प्रमुख बीड), माऊली आप्पा जरांगे (मा.जि.प. सदस्य),विक्रांत हिंगे (पो.नि. अंमळनेर),मा.कृष्णा चव्हाण(पो. उपनिरीक्षक अंमळनेर)तसेच प्रमुख मान्यवर भाऊसाहेब आण्णा भवर, बाळासाहेब पवार,अर्जुन आबा पवार, ज्ञानेश्वर पवार,रमेश सानप जय हिंद लोक चळवळ,श्रीकृष्ण नाईकवाडे जय हिंद लोकचळवळ,सुनील काळे जय हिंद लोकचळवळ,मुकुंद शिंदे शिवसेना तालुका प्रमुख पाटोदा, आदीसह पत्रकार बांधव उपस्थित राहणार आहेत.यावेळी एम.बी.बी.एस,पोलीस,एमएसइबी, शासकीय विविध पदावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाणार आहे.युवा नेते उद्धव शेठ पवार अंमळनेर यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप केले जाणार आहे.

## बीड सहोदयाच्या आदर्श पुरस्काराचे वितरण




माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव - येथील ईगलवुड इंग्लिश स्कूल येथे सीबीएसई बीड सहोदया शाळा संकुलाच्या वतीने बेस्ट टीचर अवॉर्ड्स २०२५ चा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास बीड सहोदया स्कूल कॉम्प्लेक्स चे सदस्य शाळेतील २८ प्राचार्य आणि आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते शिक्षक त्यांच्या कुटुंबासहित उपस्थित होते.

या प्रसंगी मुख्य पाहुणे म्हणून प्रख्यात समाजसेविका व संस्कार भारती देवगिरी विभागाच्या अध्यक्षा प्रा. स्नेहल पाठक या उपस्थित होत्या. तर ईगलवूड इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद भूषविले. तसेच डॉ. सुशील के. लोढा (खजिनदार, ईगलवूड इंग्लिश स्कूल, माजलगाव), बीड सहोदया स्कूल कॉम्प्लेक्स चे अध्यक्ष तथा सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख आणि लोकसेवा तसेच अविसन प्रकाशनाचे अध्यक्ष अविनाश फुरसुळे, आनंद फुरसुळे, पारस फुरसुळे, दिनेश श्रीवास्तव, बिनय कुमार, योगिता शर्मा यांचीही विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या रश्मी अरोरा यांनी बीड सहोदया स्कूलस्? कॉम्प्लेक्स राबवत असलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या स्नेहल पाठक यांचा परिचय पोदार इंटरनॅशनल स्कूल आंबेजोगाई चे प्राचार्य कीर्ती कुमार देशमुख यांनी दिला तर डॉक्टर अर्चना पवार आणि सुशील लोढा यांचा परिचय गुरुकुल इंग्लिश स्कूलचे प्राचार्य श्री.शितल सर्वज्ञ यांनी दिला. या प्रसंगी मुख्य पाहुण्या प्रा. स्नेहल पाठक यांनी आपल्या भाषणात म्हटले की, ''शिक्षक हे समाजाचे वास्तुकार आहेत. ते केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत तर विद्यार्थ्यांच्या चारित्र्य निर्मितीत महत्वाची भूमिका बजावतात. त्यांनी पुरस्कृत शिक्षकांचे कौतुक करताना सांगितले की, ''तुमच्या समर्पणामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होत आहे.'' त्यांनी शिक्षक म्हणून स्वतःचे अनुभव सांगताना शिक्षकाची भूमिका समाजामध्ये किती महत्त्वाची आहे याबद्दल माहिती दिली. तसेच इगलवूड इंग्लिश स्कूलच्या अध्यक्ष डॉ. अर्चना पवार यांनी आपल्या भाषणात म्हटले की, ''शिक्षण ही केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नसून ती व्यक्तिमत्व विकसित करण्याची कला आहे. आमचे शिक्षक हे कलाकार आहेत जे विद्यार्थ्यांच्या मनात स्वप्नांची बीजे रोवतात.'' त्यांनी प्रत्येक प्राचार्यांनी स्वतःच्या शाळेसाठी योगदान द्यावे जेणेकरून शाळा अध्यक्षाच्या नवे तर शिक्षक व प्राचार्यांच्या नावे ओळखली जावी असे आवाहन केले.

## बीड जिल्हयातुन १३०१ प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये निकाली



बीड । प्रतिनिधी

आज दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी बीड मुख्यालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन कार्यक्रम मा. न्यायमूर्ती श्री.के.सी.संत, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद व मा.न्यायमूर्ती श्री.आर.एम.जोशी, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्या हस्ते ऑनलाईनद्वारे करण्यात आले. सदर उद्घाटन कार्यक्रमास बीड जिल्हा न्यायालयाचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मा.श्री.आनंद एल.यावलकर, तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा.श्री.डब्ल्यू.ए.सय्यद, तसेच कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश मा.श्री.एल.एस.चव्हाण, बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष मा.श्री.एस.जी.पिसुरे व त्यांचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ सदर उदघाटन कार्यक्रमास उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून व मा. श्री. आनंद एल. यावलकर साहेब प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकूण. १३०१ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण ११२४१ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी ५६४ प्रकरणे निकाली निघाली आहेत. तर दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण ३६३१७ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ७३७ प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण १३०१ प्रकरणे निकाली निघाली आहेत व यामध्ये १५ कोटी ६८ लाख ६६ हजार ६०५ एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत.सदरील लोक न्यायालयाच्या यशस्वीतेसाठी मा. श्री. डब्ल्यू.ए.सय्यद, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष मा.श्री. एस.जी.पिसुरे व त्यांचे सर्व सहकारी पदाधिकारी तसेच वकील संघाचे सर्व सदस्य, जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती. न्यायालयीन कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण -मेंडके



माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे भव्य खुल्या चित्रकला स्पर्धेचे आयोजन भाजप नेते ज्ञानेश्वर मेंडके यांच्याकडून करण्यात आले होते.या स्पर्धेत माजलगाव तालुक्यासह परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता.स्पर्धेत विद्यार्थ्यांनी नामदार पंकजाताई मुंडे यांचे आकर्षक चित्र रेखाटून त्यांच्याप्रती आपला स्नेह,आदर आणि शुभेच्छा व्यक्त केल्या. पंकजाताईंची चित्रे पाहून उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे आणि कलाप्रेमाचे कौतुक केले.

स्पर्धेत सहभागी स्पर्धकांची तीन गटांमध्ये विभागणी करण्यात आली होती पहिला गट पाचवी ते सातवी, दुसरा गट आठवी ते दहावी तर तिसरा गट व्यावसायिक गट असा होता. प्रत्येक गटातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे तीन तीन विजेते निवडण्यात आले. परीक्षकांसाठी विजेते ठरविणे अवघड ठरले, मात्र आयोजक ज्ञानेश्वर मेंडके यांनी निरीक्षकामार्फत काटेकोर व पारदर्शक पद्धतीने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली.

प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना प्रत्येकी ₹ ७००१ रोख, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना प्रत्येकी ₹ ५००१ रोख, तर तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना प्रत्येकी ₹ ३००१ रोख, व सन्मानचिन्हासह प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.अशा प्रकारे एकूण नऊ विजेत्यांचा विशेष गौरव करण्यात आला.श्री सिद्धेश्वर विद्यालय, माजलगाव येथे पार पडलेल्या या बक्षीस वितरण सोहळ्यास अध्यक्षस्थानी संस्थेचे केंद्रीय संचालक अमरनाथ खुरपे उपस्थित होते.प्रमुख उपस्थिती म्हणून भाजपा महाराष्ट्र कार्यकारणी सदस्य अरुण राऊत,माजी नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके, प्रदेश सदस्य प्रशांत पाटील, तालुकाध्यक्षा रूपाली कचरे, तालुकाध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके, शहरमंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी,दिपक मुंडे, ईश्वर खुरपे, ज्ञानेश्वर सरवदे, महिला तालुकाध्यक्षा गौरीताई देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच भाजपचे तालुका पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये शरद कचरे, सरचिटणीस प्रदीप जाधवर,उपाध्यक्ष कल्याण शेप,उपाध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर,नारायण मेंडके,उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण, चिटणीस अविनाश कांडूरे,संजय पवार,युवा नेते राम शिंदे,संतोष जाधव,पूजा मुंडकर,सुप्रिया मालानी,दत्ता महाजन,भरत जोशी,संतोष जेथलीया,सतीश जोशी,राजेश मिटकरी,प्रल्हाद दळवी,सुभाष कांबळे,मनोज कोरडे,कि.आडगाव सर्कल दत्ता जाधव, बाळासाहेब गायकवाड, दिलीपराव सोळंके, बबनराव सुरवसे आदीं कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-६०० दिनांक-२८/०८/२०२५

### जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती कल्याणी रामनाथ जगताप रा.विठ्ठलवाडी ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कल्याणी रामनाथ जगताप | स्वत: | १४/०६/१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २८/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

### जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार सुरेश तुकाराम चौधरी रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे रा.परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(२४६६ ) दि.१३/६/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र.१३५५ दि.१८/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती रमेश ज्ञानेश्वर आनडे रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(३११) ज्याचा मिळकत क्रमांक (११) चे भुखंड क्रमांक (घ.नं.४१०७) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- ६.१० अंतर्गत रोड
पश्चिम-बोनगे यांचा प्लॉट
दक्षिण-अरुण भाग्यवान
उत्तर-मुंडे यांचा प्लॉट

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (50x50 फुट) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

### जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार गणेश गुलाबराव गाडगे २) पुजा राधाकिसन अधुरे रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(४२६२ ) दि.०६/८/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र.१४६० दि.१९/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती विष्णू बापूराव जाधव रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.() ज्याचा मिळकत क्रमांक () चे भुखंड क्रमांक ७४९ मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- अंतर्गत रोड
पश्चिम-मिळकत क्र.९
दक्षिण-मिळकत क्र.१९
उत्तर-मिळकत क्र.२१

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (50x50 फुट) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

### जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार महेश बापुराव कानडे २) मालपानी राम ओमप्रकाश रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे ता.परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(२१२०) दि.१०/७/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र.१४४४ दि.१३/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती शाकेर तारकेश्वर काचमिया रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(२५१/२) ज्याचा मिळकत क्रमांक (३) चे भुखंड क्रमांक ( ) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व-९ मिटरचा रोड
पश्चिम-प्लॉट क्र.९
दक्षिण-प्लॉट क्र.२
उत्तर-प्लॉट क्र.४

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (१०२) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
रविवार दि.१४ सप्टेंबर २०२५ | ४

# वनामकृवि तर्फे 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासोबत'

## शास्त्रज्ञ पोहोचले थेट शेतकऱ्यांच्या बांधावर ; विविध पिकांबाबत केले मार्गदर्शन

**परभणी । प्रतिनिधी**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या (वनामकृवि) 'माझा एक दिवस, माझ्या बळीराजासोबत' या उपक्रमांतर्गत मराठवाड्यातील सर्व आठ जिल्ह्यांतील विविध ठिकाणी थेट शेतावर जाऊन शास्त्रज्ञांनी सद्य:स्थितीत खरीप पिके, भाजीपाला पिके, फळपिकांच्या व्यवस्थापनावर शेतकऱ्यांना माहिती दिली.**



कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा यांच्या संकल्पनेतून विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासोबत' या उपक्रमाचे आयोजन महिन्यातील दुसऱ्या बुधवारी करण्यात येते. या अंतर्गत बुधवारी कृषी विद्यापीठाच्या ११ चमूमधील ४४ शास्त्रज्ञांनी प्रक्षेत्र भेटी, चर्चासत्रे, कृती प्रात्यक्षिके, शेतकरी मेळाव्यांद्वारे थेट शेतकऱ्यांशी संवाद साधला. ५५० हून अधिक शेतकऱ्यांना सद्य:स्थितीतील पीक व्यवस्थापनावर माहिती दिली. यात कीडनियंत्रण, सततच्या पावसात पिकांचे संरक्षण, मृदा आरोग्य संवर्धन, सुधारित वाणांचा वापर, पीक उत्पादन वाढीसाठी लागवड तंत्रज्ञानावर माहिती दिली. विद्यापीठाचे परभणी येथील विस्तार शिक्षण संचालनालय, कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्र, नांदेड येथील कापूस संशोधन केंद्र, केळी संशोधन केंद्र, परभणी, लातूर, छत्रपती संभाजीनगर, अंबाजोगाई येथील विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्रे, छत्रपती संभाजीनगर, बदनापूर, खामगाव, तुळजापूर येथील कृषी विज्ञान केंद्रे, लातूर येथील गळीत धान्य संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. सूर्यकांत पवार, प्रा. अरुण गुट्टे, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. वसंत सूर्यवंशी, डॉ. अरविंद पंडागळे, डॉ. दिलीप हिंगोले, डॉ. डी. डी. पटाईत, डॉ. पवन ढोके, डॉ.संजय देवकुळे, डॉ. डी. पी. देशपांडे, प्रा. अशोक घोटमुकळे, डॉ. संतोष वाघमारे, प्रा. कल्याण दहिफळे, डॉ. हनुमान गरुड, डॉ. एस. डी. सोमवंशी, डॉ. एस. आर. धांडगे, डॉ. अनिता जिंतूरकर, डॉ. संजूला भवर, डॉ. तुकेश सुरपाम, प्रा. किशोर जगताप, डॉ. भय्यासाहेब गायकवाड, डॉ. बी. के. आरबाड, डॉ. एस. एन. झगडे, मधुकर मांडगे, कृषी विभागातील साळवे, डॉ. वसंत देशमुख यांचा सहभाग होता.

# उच्च उत्पादन देणारी पेरुची सुधारित जात 'अर्का पूर्णा'!

अर्का पूर्णा ही बेंगळुरू द्वारे संशोधित आणि विकसित केलेली एक विशिष्ट पेरूची जात आहे. उच्च उत्पन्न आणि उत्कृष्ट गुणवत्तेसाठी ओळखल्या जाणाऱ्या या पेरुचा वापर खाण्यासाठी आणि प्रक्रिया या दोन्हीसाठी करता येतो. मध्यम जोमदार वाढ आणि विपुल फळधारणा या वैशिष्ट्यांसाठी ही जात ओळखली जाते. ज्यामुळे विविध राज्यांमधील पेरू-उत्पादक प्रदेशांमध्ये मध्यम ते उच्च-घनतेच्या लागवडीसाठी ही आदर्श जात आहे.

**अर्का पूर्णा पेरूच्या झाडाची वैशिष्ट्ये :**

अर्का पूर्णा पेरुची झाडे मध्यम जोमदार वाढ दर्शवितात, त्यामुळे मध्यम ते उच्च-घनता लागवडीसाठी योग्य आहे. हे वाण वर्षभर फळधारणा आणि जास्त उत्पादन यासाठी ओळखले जाते.

**'अर्का पूर्णा' पेरुची वैशिष्ट्ये :**

अर्का पूर्णा पेरुची फळे गोल-आकाराची आणि मध्यम ते मोठ्या आकाराची असून सामान्यत: २०० ते २३० ग्रॅम वजनाची असतात. फळाची बाह्य त्वचा गुळगुळीत आणि चमकदार असते, ज्यामुळे दिसण्यास आकर्षक असतात. अर्का पूर्णा पेरुचा गर घट्ट, पांढरा रंगाचा, जाड असून त्याची टिकवण क्षमता जास्त असल्यामुळे हाताळण्यास सोपे आहे. या पेरुला उत्कृष्ट चव असून १०-१२ ब्रिक्स दरम्यान गोडवा आहे. पेरुची ही जात एस्कॉर्बिक ॲसिडने (व्हिटॅमिन सी) समृद्ध आहे. १९० ते १९८ मिलीग्रॅम/१०० ग्रॅम फळांचा लगदा आहे. अर्का पूर्णा पेरूमध्ये सामान्यत: मध्यम-मऊ बिया असतात, ज्यामुळे ते वापरण्यासाठी



आणि प्रक्रियेसाठी सोयीस्कर ठरतात.

**अर्का पूर्णा पेरूची दुहेरी उपयोगिता :**

फळाची उत्कृष्ट चव आणि पोत यामुळे हे फळ खाण्यासाठी आणि पदार्थांच्या निर्मितीसाठी योग्य आहे. हे फळ विविध प्रक्रिया करण्यासाठी देखील योग्य आहे. अर्का पूर्णा पेरूची लागवड खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामात केली जाते, ज्यामुळे वर्षभर उपलब्धता आणि उत्पादकता सुनिश्चित करते. ही जात पेरू-उत्पादक राज्यांमध्ये लागवडीसाठी योग्य आहे, या प्रदेशांमध्ये प्रचलित हवामान आणि माती प्रकार यांचा फायदा होतो. उच्च उत्पादन, उत्कृष्ट फळ गुणवत्ता आणि वापर आणि प्रक्रिया या दोन्ही हेतूसाठी अर्का पूर्णा ही पेरूची जात सुयोग्य आहे. चांगली वाढ, पेरूचे पौष्टिक फायदे आणि आकर्षकपणा यामुळे पेरू-उत्पादक प्रदेशांमध्ये शेतकरी आणि ग्राहक हे या पेरुला पसंती दर्शवितात. उच्च उत्पादन आणि गुणवत्ता देणाऱ्या पेरूची लागवड करण्यात स्वारस्य असलेल्या शेतकऱ्यांसाठी अर्का पूर्णा ही पेरूची उत्कृष्ट जात आहे.

# जनावरांसाठी आधुनिक गोठा ठरतो अत्यंत फायदेशीर

गोठ्यातील जनावरांचे आरोग्य, आहार, प्रजनन, हालचाल आणि पर्यावरणीय परिस्थिती यांचा सातत्याने मागोवा घेण्यासाठी इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि कृत्रिम बुद्धीमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. सध्या आधुनिक गोठ्यांमध्ये इंटरनेट ऑफ थिंग्ज आधारित अनेक उपकरणे वापरली जातात. यामुळे जनावरांची देखभाल, आरोग्य परीक्षण, आहार व्यवस्थापन आणि गोठ्याचे वातावरण योग्य राखणे अधिक सोपे झाले आहे. गाय, म्हैस यांना गळ्यात घालण्यात येणाऱ्या कॉलरमध्ये तापमान, हालचाल, हृदयगती, चघळण्याचा वेग अशा गोष्टी मोजणारे सेन्सर बसवलेले असतात. जनावराची तब्येत बिघडू लागल्यास मोबाइलवर लगेच संदेश मिळतो.

**पर्यावरण नियंत्रक यंत्रणा :**

गोठ्यातील तापमान, आर्द्रता, वायुवीजन यासाठी सेन्सर्स बसवले जातात. तापमान वाढल्यास पंखा आपोआप सुरू होतो किंवा वायुवीजन सुधारण्यासाठी यंत्रणा कार्यरत होते.



**पाणी, आहार व्यवस्थापन :**

पाण्याच्या टाकीतील पाणी कमी झाले, तर मोबाइलवर सूचना येते. त्याप्रमाणे, स्मार्ट फीडर यंत्रणेमुळे जनावराला वय, वजन, उत्पादकतेनुसार योग्य प्रमाणात खाद्य आपोआप दिले जाते.

**स्थान शोध यंत्रणा :**

जीपीएस तंत्रज्ञानामुळे गोठ्यातील जनावर कुठे आहे हे मोबाइलवर बघता येतं. जर जनावर गोठ्याबाहेर गेले, तर लगेच अलार्म व सूचना मिळते. चोरांपासून संरक्षणासाठी ही पद्धत फार उपयुक्त आहे.

**इंटरनेट ऑफ थिंग्ज तंत्रज्ञान:**

सेन्सर्सद्वारे विविध माहिती (तापमान, हालचाल, पिण्याचे पाणी, चघळण्याचा वेग) गोळा केली जाते. संप्रेषण ही माहिती इंटरनेटच्या माध्यमातून क्लाउड किंवा ॲपवर पाठवली जाते. यंत्रणेद्वारे संकलित माहितीचे विश्लेषण केले जाते. एखादी अडचण आढळल्यास तत्काळ सूचना दिली जाते किंवा यंत्रणा आपोआप काम सुरू करते.

**तंत्रज्ञानाचा फायदा :**

जनावरांचे आजार लवकर ओळखता येतात. उत्पादन क्षमता वाढते. गर्भधारणेची योग्य वेळ ठरवता येते. औषधांचा खर्च, वेळ वाचतो. श्रमात बचत व व्यवस्थापन अधिक सोईस्कर.

# ऊस पिकावरील 'पोक्का बोइंग' रोगावरील उपाय!


**सध्याच्या परिस्थितीत ऊस पिकामध्ये 'पोक्का बोइंग' रोगाचा प्रादुर्भाव होत असल्याचे आढळून आले आहे. रिमझिम पडणाऱ्या पावसामुळे बऱ्याच ठिकाणी ऊस शेतात पाणी साचल्याने पिकांच्या सभोवताली सापेक्ष आर्द्रता वाढून तापमान कमी झालेले असते. त्यामुळे उसावरील या रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ तज्ज्ञांनी यासाठी काय काळजी घ्यायची आणि या रोगाचे नियंत्रण कसे करायचे याविषयी महत्त्वाच्या सूचना दिलेल्या आहेत.**

**'पोक्का बोइंग' रोगाचा प्रादुर्भाव :**

या रोगाचा प्रादुर्भाव 'फ्यूजॅरियम मोनिलीफॉरमी' या बुरशीमुळे होतो. सततच्या पडणाऱ्या पावसामुळे पिकातील आर्द्रता वाढून तापमान कमी झाल्यास ही बुरशी कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर उसाच्या पोंग्यात वाढते आणि रोगाचा प्रादुर्भाव होतो. या रोगास कारणीभूत बुरशीचा प्रसार हवेद्वारे होतो.

**'पोक्का बोइंग' रोगाची लक्षणे :**

वर नमूद केल्याप्रमाणे अनुकूल



परिस्थिती निर्माण झाल्यास या रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीची लागण प्रथमता उसाच्या शेंड्यातील कोवळ्या पानावर दिसून येते. सुरुवातीस पोंग्यातील तिसऱ्या व चौथ्या पानांच्या बेचक्यात पांढरट पिवळसर चट्टे दिसून येतात तसेच रोगाची लागण झालेल्या पानावर सुरकुत्या पडून पाने आकसतात. रोगाची तीव्रता वाढल्यानंतर उसाची पाने एकमेकात वेणीसारखी गुरफटतात. पाने एकमेकांत गुरफटल्याने पिकाचे पोषण व्यवस्थित होत नाही परिणामी उसाचे कांडे आखूड व वेडेवाकडे होतात. अधिक प्रमाणात रोगाचा प्रादुर्भाव वाढल्यास पोंगेमर किंवा शेंडा कुज सुध्दा दिसून येतो. शेंडा कुज झालेल्या उसातील शेंड्याचा जोम नष्ट झाल्याने उसावरील डोळ्यातून पांगश्या फुटतात व कालांतराने असे ऊस वळतात. रोगट उसाच्या कांड्या आखूड झाल्याने व पांगश्या फुटल्याने उसाच्या उत्पन्नात घट येते. या रोगामुळे उसाच्या बेटातील रोगग्रस्त फुटव्यांचेच नुकसान होते तथापि बाधित न झालेल्या उसाचे नुकसान होत नाही. ऑगस्ट महिन्यानंतर आर्द्रता कमी आणि तापमान वाढल्याने या रोगाची तीव्रता हळूहळू कमी होत जाते.

**नियंत्रण उपाय :**

शेतात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी, तसेच पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने करावा. शेंडे कुज व पांगश्या फुटलेले ऊस आढळून आल्यास ते त्वरित नष्ट करावेत. या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास लगेचच कार्बेन्डाझिम १२%+ मॅन्कोझेब ६३% डब्लूपी २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०% डब्लूपी २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी सोबत उच्च दर्जाचे स्टिकर मिसळून १० ते १२ दिवसाच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.


# सोयाबीन 'पाण्यात', शेतकरी अडचणीत

उमरगा : उमरगा तालुक्यातील आलूर परिसरात सलग दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. आलूर शिवारात ढगफुटीसदृश धो धो पाऊस झाल्याने उडीद, सोयाबीन, तूर, ऊस या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

सलग तीन तास झालेल्या मुसळधार पावसामुळे काढणी केलेल्या उडीद, सोयाबीनचे ढीग अक्षरश: पाण्यामध्ये वाहून गेले. शेतबंधारे फुटून अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. पावसाचे पाणी साचल्याने शेतशिवाराला तलावाचे स्वरूप आले आहे. रस्ते वाहून गेले, तर आलूर बोळेगावमार्गे अक्कलकोटला जाणाऱ्या रस्त्यावर चार फुटांपर्यंत पाणी वाहत असल्याने हा मार्ग सकाळपासून बंद असल्याने वाहतूक सध्या पूर्णपणे बंद आहे. गेल्या दोन महिन्यांपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे उडीद, सोयाबीन या पिकांची अगोदरच वाढ खुंटली होती. आता जे थोड्याबहुत प्रमाणात पिके काढणीला आली होती. त्यांचे सुद्धा संपूर्ण नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे. आलूर येथील शरणप्पा काशेट्टी यांनी चार एकरांतील सोयाबीन काढून शेतामध्ये ठेवले होते. आज पहाटे झालेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण चार एकरांवरील सोयाबीन पीक पाण्यात भिजून नुकसान झाले.

# शेतीला सुपीक करण्यासाठी धैंचा लागवड आवश्यकच

**धैंचा, ज्याला सेस्बानिया बिस्पिनोसा असेही म्हणतात. ही एक शेंगायुक्त वनस्पती आहे जी लवकर वाढते आणि पर्यावरणीयदृष्ट्या शेतीमध्ये तिच्या योगदानाबद्दल त्याचे कौतुक केले जाते. मातीचे आरोग्य सुधारण्याच्या, नायट्रोजनचे निराकरण करण्याच्या आणि गुरांसाठी चारा पुरवण्याच्या क्षमतेव्यतिरिक्त, ही वनस्पती उष्णकटिबंधीय प्रदेशात मूळ आहे आणि अत्यंत मौल्यवान आहे. हिरवळीचे खत ही एक पद्धत आहे जी शेतकरी आणि बागायतदार खराब झालेल्या मातीला पुनरुज्जीवित करण्यासाठी, होणारी धूप कमी करण्यासाठी आणि कृत्रिम खतांवरील त्यांचे अवलंबित्व कमी करण्यासाठी वापरतात. कठीण हवामान आणि खराब मातीत वाढण्याची त्याची प्रवृत्ती असल्याने, शेतकऱ्यांना फायदशीरश ठरते. जर तुम्हाला धैंचाचे फायदे चांगले समजले असतील तर माती व्यवस्थापन आणि पीक उत्पादनाकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन लक्षणीयरीत्या बदलू शकतो,**



**हिरवे खत म्हणून वाढवण्याचे फायदे:**

धैंचाची जलद वाढ आणि पोषक तत्वांनी समृद्ध बायोमासमुळे, हिरवे खत म्हणून वापरण्यासाठी हे उत्तम आहे. जेव्हा ते जमिनीत पुन्हा नांगरले जाते तेव्हा नायट्रोजन, फॉस्फरस आणि सेंद्रिय पदार्थ बाहेर पडतात, ज्यामुळे तांदूळ किंवा गहू यासारख्या पिकांसाठी जमिनीची सुपीकता वाढते. या पद्धतीमुळे कृत्रिम खतांचा वापर कमी होतो, ज्यामुळे किंमती आणि पर्यावरणाला होणारे धोके दोन्ही कमी होतात. मातीचा पोत आणि पाणी साठवण्याच्या क्षमतेत सुधारणा झाल्याचे नोंदवले गेले आहे, ज्यामुळे पिकांना दुष्काळाचा सामना करण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, धैंचाची दाट पाने तणांना रोखण्यास मदत करतात, ज्यामुळे हाताने तण काढण्यासाठी लागणारा वेळ आणि श्रम वाचतात.

**धैंचाची लागवड कशी करावी :**

प्रथम, धैंचा बियाणे ओलसर आणि पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या जमिनीत दोन ते तीन सेंटीमीटर खोलीवर पसरवा. जर तुम्हाला नैसर्गिक ओलाव्याचा फायदा घ्यायचा असेल, तर पावसाळ्यापूर्वीचा काळ हा त्यासाठी योग्य आहे. जोमदार वाढ सुनिश्चित करण्यासाठी बियाणे एकमेकांपासून ३०-४५ सेंटीमीटर अंतरावर लावावेत. सहा ते आठ आठवड्यांच्या कालावधीत, झाडे दाट छत विकसित करतील. फुले फुलायला सुरुवात झाल्यावर (५०-६० दिवस) नांगराचा वापर करून ती कापून घ्या आणि नंतर मातीत मिसळा. या अचूक क्षणी, पोषक तत्वांचे जास्तीत जास्त उपायोग होतो. मुख्य पिकांच्या दरम्यान धैंचाला आच्छादन पीक म्हणून वाढवणे हा खराब झालेल्या मातीत हळूहळू सुपीकता पुनर्संचयित करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे.

**शाश्वत शेती पद्धतींमध्ये धैंचा पिकाचा वापर :**

धैंचा रासायनिक इनपुटचे प्रमाण कमी करून आणि जैवविविधतेचे प्रमाण वाढवून शाश्वततेत योगदान देते. पीक रोटेशनमध्ये, कीटकांचे चक्र तोडण्यासाठी आणि जमिनीतील नायट्रोजन बदलण्यासाठी याचा वापर केला जातो. कृषी वनीकरणाच्या संदर्भात, ते वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी किंवा सावलीचा स्रोत म्हणून काम करते. याशिवाय, शेतकरी तणांची वाढ कमी करण्यासाठी आणि पीक उत्पादन वाढवण्यासाठी धैंचाची तृणधान्यांसह आंतरपीक घेतात. त्याची मुळे खूप खोलवर असल्याने, ती संवर्धन शेतीचा एक आवश्यक घटक आहे कारण ती पोषक तत्वांचे गळती रोखते.




## जागतिक दिवस: हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

७८६ : हरुन अल रशिद बगदादचा खलिफा झाला.
१८९३ : सरदार खाजवीवाले, श्री. गणपतराव घोटवडेकर व भाऊ रंगारी यांनी पुण्यात पहिल्यांदा सार्वजनिक गणपती बसवले. लोकमान्य टिळकांनी हा उपक्रम उचलून धरून त्याला राष्ट्रीय उत्सवाचे स्वरुप दिले. हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात होय.
१९१७ : रशियाने स्वत:ला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४८ : दोन तासांच्या चकमकीनंतर भारतीय सैन्याने दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर सुमारे साडे सहाशे वर्षांनी स्वतंत्र झालेल्या किल्ल्यात भारतमातेचे मंदिर उभारण्यात आले.
१९४९ : हिंदी हि भारताची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करून हिंदी दिन साजरा केला.
१९५९ : सोव्हियेत संघाचे लुना २ हे अंतरिक्षयान चंद्रावर कोसळले. चंद्रापर्यंत पोचणारी ही पहिली मानवनिर्मित वस्तू होती.
१९६० : ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कन्ट्रीज' ची स्थापना झाली.
१९७८ : 'व्हेनेरा-२' हे रशियाचे अंतराळयान शुक्राकडे झेपावले.
१९९५ : संगीतकार दत्ता डावजेकर यांना महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९९ : किरिबाटी, नौरू व टोंगा या राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
२००० : मायक्रोसॉफ्ट कंपनी ने विंडोज एमई रिलीज केले.
२००३ : इस्टोनियाच्या जनतेने जनमत चाचणीत युरोपीय संघात सामील होण्यासाठीचा कौल दिला.
२०१५ : गुरुत्वीय लहरी गुरुत्वीय लहरींचे पहिले निरीक्षण करण्यात आले.
२०१७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांनी आज संयुक्तपणे भारताच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१३ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ जुलै १७८१)
१७७४ : भारतातील वे१४ राज्यपाल जनरल लॉर्ड विलियम बेंटीक यांचा जन्म. (मृत्यू: १७ जून १८३९)
१८६७ : विष्णू नरसिंह जोग वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक (मृत्यू: ५ फेब्रुवारी १९२०)
१८९७ : पार्श्वनाथ आळतेकर नट, दिग्दर्शक व नाट्यशिक्षक (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९५७)
१८९८ : महाराष्ट्रीयन मराठी नाट्य-चित्र अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते, नाट्यसंस्था स्थापक पार्श्वनाथ आळतेकर यांचा जन्मदिन.
१९०१ : यमुनाबाई हिर्लेकर शिक्षणतज्ञ व विचारवंत (मृत्यू:)
१९१४ : भारतीय हिंदी चित्रपत सृष्टीतील सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक जी. पी. सिप्पी यांचा जन्मदिन.
१९२१ : दर्शनसिंहजी महाराज शिख संतकवी, 'मंजील-ए-नूर' आणि 'मता-ए-नूर' या ऊर्दू कवितासंग्रहांबद्दल त्यांना ऊद्रू अकादमीचे पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ३० मे १९८९)
१९२३ : राम जेठमलानी केन्द्रीय कायदामंत्री, कायदेपंडीत, प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कायदेपंडित तसचं, माजी भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष
१९३२ : डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (मृत्यू: २ मार्च १९८६)
१९४८ : वीणा सहस्रबुद्धे प्रख्यात भारतीय ग्वाल्हेर व जयपूर येथील किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील गायक व संगीतकार
१९५७ : केपलर वेसेल्स दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटखेळाडू
१९६३ : रविंद्र रामनारायण ऊर्फ 'रॉबिन' सिंग अष्ट्पैलू क्रिकेटपटू व प्रशिक्षक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८९१ : पोप स्टीफन (पाचवा) (जन्म: )
१९०१ : अमेरिकेचे वे२५ राष्ट्राध्यक्ष विल्यम मॅकिन्ले यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १८४३)
१९७१ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार, लेखक व साहित्यकार ताराशंकर बंद्योपाध्याय यांचे निधन.
१९७९ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ जुलै १९१७)
१९८५ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार रामकृष्ण शिंदे यांचे निधन.
१९८९ : बेन्जामिन पिअरी पाल आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय कृषी संशोधक, पद्मश्री (१९५८), पद्मभूषण (१९६८), इंडीयन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च () चे पहिले संचालक, तांबेरा रोगाला दाद न देणार्या व अधिक उत्पादन देणार्या गव्हाच्या जाती त्यांनी शोधून काढल्या. (जन्म: २६ मे १९०६)
१९९८ : प्रा. राम जोशी शिक्षणतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म:)
२०११ : हरिश्चंद्र बिराजदार कुस्तीगीर व प्रशिक्षक (जन्म: ५ जून १९५०) ध्यानचंद पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीगीर व प्रशिक्षक
२०१५ : सबवे चे सहसंस्थापक फ्रेड डेलुका यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९४७)



राज्य लोकतंत्र
# अहिल्यानगर-जालना
रविवार दि.१४ सप्टेंबर २०२५ ५



# अनुदान घोटाळा प्रकरणी अठरा आरोपीचे अटकपुर्व जामीन फेटाळले

जालना । प्रतिनिधी

शासनाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी सन-२०२२, २०२३, २०२४ मध्ये अतिवृष्टी, पूर, नापिकी, अवकाळी पाऊस व दुष्काळ इत्यादी कारणास्तव वेळोवेळी ०४ शासन निर्णय निर्गमित करुन बाधीत शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्याकरीता आदेशीत होते. सदर प्रकरणात मोठया प्रमाणावर शासकीय रकमेचा अपहार झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणी अंबड पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. यातील काही आरोपींनी अटक पूर्व जामिनसाठी अर्ज केला होता मात्र सुमारे १८ आरोपिंचा अटक पूर्व जामीन न्यायालयाने फेटाळला आहे.

या प्रकरणात पोलीस ठाणे अंबड येथे गु.र.नं. ४५३/२०२५ कलम ३१६(४),३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८,३(५) सह ५२,५३ आपत्ती व्यवस्थान कायदा २००५ दिनांक १९/०८/२०२५ रोजी गुन्हा नोंद असुन मा. पोलीस अधिक्षक जालना यांचे आदेशाने तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग झालेला आहे.

दरम्यान काही आरोपीतानी पोलीसांचे नजरे आड राहुन मा. जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपुर्व जामीनसाठी अर्ज सादर केले होते. सदर प्रकरणात सखोल चौकशी करुन मा. जिल्हा व सत्र न्यायालयात योग्य रित्या बाजु मांडली त्यामध्ये गायधनी जिल्हा व सत्र न्यायधिश, अंबड यांनी दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकुण घेऊन एकुण १८ आरोपीचे अटकपुर्व जामीन अर्ज फेटाळले. उर्वरीत आरोपी पैकी १ आरोपीस बुलढाणा येथुन अटक केली आहे. इतर फरार आरोपीचे शोधार्थ पथके रवाना आहेत. सदरील एका आरोपीला ०७ दिवसांचा पिसीआर मंजुर झाला आहे. तसेच गुन्हयात दिनांक ११ सप्टेबर २०२५ रोजी आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकांने तांत्रीक तपासाचे आधारे गुन्हयातील आरोपी सुशिलकुमार दिनकर जाधव सहाय्यक महसुल अधिकारी तहसील कार्यालय अंबड यास बुलढाणा येथुन अटक केलेली असल्याने आरोपीस पोलीस कस्टडी रिपोर्ट सह आरोपीस प्रथमवर्ग न्यायालय अंबड कोर्ट ०२ रे यांचे समक्ष हजर केले. यामध्ये सरकार पक्षाचे व आरोपी पक्षाचा युक्तीवाद ऐकुण घेतल्यानंतर मा. न्यायालयाने आरोपीची दिनांक १८/सप्टेंबर २०२५ पर्यंत ०७ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला.

सदरची कामगीरी ही अजयकुमार बंन्सल, पोलीस अधिक्षक, आयुष नोपाणी, अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सिध्दार्थ माने, प्रभारी पोलीस उप अधिक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, मिथुन घुगे, सहा. पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, श्रेयश वाघमारे, महीला अंमलदार जयश्री निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली. सदर प्रकरणात आरोपीचा अटकपुर्व जामीन अर्ज फेटाळण्यामध्ये बाबासाहेब इंगळे, जिल्हा सरकारी वकिल जालना यांनी सरकार पक्षाची बाजु सक्षमपणे मांडणी केली आहे.

## एमपीएससीतून अधिकारी झालेल्या तेजस्विनी वमनचा बिक्कड सर मित्र परिवाराच्या वतीने सत्कार

कळंब । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगमार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमधून तेजस्विनी वमन हिची अधिकारी पदावर निवड झाली. त्याबद्दल बिक्कड सर मित्र परिवाराच्या वतीने कळंबमध्ये मोठ्या थाटामाटात सत्कार सोहळा संपन्न झाला.

गटशिक्षण कार्यालय पंचायत समिती कळंब येथे कार्यरत असलेले बिभीषण वमन (जगताप) रा. कन्हेरवाडी ता. कळंब यांची कन्या तेजस्विनी बिभीषण वमन जगताप हिची कृषी आयुक्तालय येथे लघुलेखक निम्न श्रेणी वर्ग २ या पदावर निवड झाल्याबद्दल बिक्कड सर मित्र परिवाराच्या वतीने हभप महादेव महाराज आडसूळ व मान्यवरांच्या शुभहस्ते तेजस्विनी व तिच्या आई-वडिलांचा कळंब येथे शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. दोन्ही डोळ्यांनी अंध असलेले बिभीशन वमन हे गटशिक्षण कार्यालय कळंब येथे कार्यरत आहेत. त्यांचा एक मुलगा गव्हर्मेंट कॉलेज एम्स या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण घेत आहे तर दुसरा इंजिनियर करत आहे. तिन्ही मुलांनी आपले नेत्रदीप यश मिळवले आह. यावेळी राजेंद्र बिक्कड यांनी बिभीशन वमन यांनी शिक्षणासाठी केलेला संघर्ष सांगितला तर बिभीशन वमन म्हणाले की मुलीला गुलाल लागल्याशिवाय हळद लावणार नाही. म्हणजे नौकरी लागल्याशिवाय लग्न करणार नाही ते स्वप्न पूर्ण केले तसेच ते छोट्याशा किरायाच्या रूम मध्ये राहून आपली तिन्ही मुले उच्चशिक्षित कशी केली याबाबत त्यांनी सांगितले.



सत्काराला उत्तर देताना तेजस्विनी म्हणाली की, मी शेतकऱ्यांची कन्या आहे आणि गोरगरीब लोकांना मदत करण्यास सदैव तत्पर राहील. या कौतुक सोहळ्यासाठी प्रा.सतीश मातने, मुख्याध्यापक राजेंद्र बीक्कड, राजेंद्र पवार, डॉ. अशोक शिंपले, प्रा.महादेव गपाट, ऋषीकुमार साबळे, रमेश शिंदे, संतोष मोहिते, प्रदीप यादव, संदीप मगर, निशिकांत अडसूळ, आप्पासाहेब कस्पटे, अभिजीत डांगरे या सर्वांच्या उपस्थित सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड तर आभार प्रदर्शन प्रा.महादेव गपाट यांनी केले.



## जालना महापालिका निवडणूकीसंदर्भात खा. काळे यांच्याकडून आढावा बैठक

जालना । प्रतिनिधी

आगामी जालना महानगर पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच जालना शहरात एक आढावा बैठक पार पडली. या बैठकीस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, कल्याण दळे, जिल्हाध्यक्ष राजभाऊ देशमुख, शहराध्यक्ष अतिक खान, सेवादल जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, महिला काँग्रेस अध्यक्ष नंदाताई पवार व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत निवडणुकीच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संघटनात्मक बळकटी, प्रचाराची दिशा, बूथ पातळीवरील नियोजन, कार्यकर्त्यांची जबाबदारी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. खा काळे यांनी कार्यकत्यांना जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून निवडणुकीत सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन केले. यावेळी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विविध प्रश्न मांडले. आगामी निवडणूक स्थानिक पातळीवर महत्वाची असून कार्यकर्त्यांच्या एकजुटीतून यश निश्चित असल्याचा विश्वास खा. काळे यांनी व्यक्त केली.

## हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षणासाठी जिल्ह्यातील बंजारा समाजाचा सोमवारी जालन्यात मोर्चा

**जालना । प्रतिनिधी**

**बंजारा समाजास हैदराबाद स्टेट गॅझेट - १९२० नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी सकल बंजारा समाजाच्या वतीने सोमवारी जालना शहरात विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती अखिल भारतीय बंजारा आरक्षण समितीच्या वतीने देण्यात आली.**

महाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षणाबाबत नुकताच हैदराबाद स्टेट गॅझेटचा आधार जी.आर. काढला आहे. या पार्श्वभूमीवर बंजारा समाज हा हैदराबाद स्टेट गॅझेट नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गात मोडत असतांना भाषावार प्रांत रचनेनंतर महाराष्ट्रात बंजारा समाजाचा विमुक्त जाती प्रवर्गात समावेश करण्यात आला. आंध्रप्रदेश, तेलंगणा प्रमाणे अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी सोमवारी सकाळी १० वा. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास अभिवादन करून मोर्चाला सुरुवात होईल. गांधी चमन, शनी मंदिर, नूतन वसाहत मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चाचे सभेत रुपांतर होईल. मोर्चात महिला, समाज बांधवांनी मोठ्या संख्येने पारंपारिक वेशभूषेत सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय बंजारा आरक्षण समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## झोपेत नव्हे तर जागेपणी बघितलेली स्वप्ने व्यक्तीस यशस्वी बनवतात -डॉ.बाळासाहेब डोळे

जालना । प्रतिनिधी

झोपेत नव्हे तर जागेपणी बघीतलेली स्वप्ने व्यक्तीस यशस्वी बनवतात, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. बाळासाहेब डोळे यांनी घनसावंगी येथे संत रामदास महाविद्यालयात या महाराष्ट्र शासनाच्या करियर कट्टा या उपक्रमाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी केले.

यावेळी व्यासपीठावर अध्यस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र परदेशी, साह्यक कुलसचिव डॉ. भगवान फड उपप्राचार्य डॉ गजानन अवचार करियर कट्टा समन्वयक डॉ. प्रशांत सोनवणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. प्रमोद जायभाये यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. सोनवणे, पाहुण्याचा परिचय प्रा. सुनील हिवाळे तर आभार प्रा. माधव गुट्टे यांनी केले. पुढे बोलतांना डॉ. डोळे म्हणाले की, जे आपल्या जवळ नसते ते प्राप्त करण्याचा हट्टास प्रत्येकाला असतो व त्या प्राप्ती करिता शाळा महाविद्यालये हे महत्वाचे ठिकाण आहे. जीवनात करियर निर्माण करण्याकरिता उमंग, उत्साह व आत्मविश्वास हा अंगी असला पाहिजे. जीवनात गोधळणारी परिस्तिथी न ठेवता विद्यार्थ्यांनी आपली निश्चित अशी दिशा ठरवून वाटचाल केली पाहिजे. भारत हा जगामध्ये महासत्ता म्हणून ज्ञानाचे परिवर्तन तंत्रज्ञानात करून उदयास येत आहे. यानंतर श्री फड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की जीवनात स्पर्धा वाढली असल्याने जीवनात प्रत्येक क्षणाचा योग्य वापर करून यश मिळवलं पाहिजे. आज नेट गुगल मोबाईल यासारखे ज्ञानाचे भांडार सर्वाकडे उपलब्ध असतांना देखील विद्यार्थी भरकडत चालला आहे. असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ परदेशी म्हणाले की ग्रामीण भागातील विद्यार्थी सर्वगुण सम्पन्न असून फक्त दिशा व मार्गदर्शनाची त्यांना गरज आहे व ती गरज महाविद्यालयात उपस्थित राहिल्यांतरच पूर्ण होईल अशा प्रकारचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# हजरत मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त दयावान प्रतिष्ठानतर्फे ॲम्बुलन्स सेवेचा शुभारंभ

कळंब । प्रतिनिधी

हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या १५०० व्या जयंतीनिमित्त दयावान प्रतिष्ठान व लोकसहभागातून ॲम्बुलन्स सेवेचा शुभारंभ करण्यात आला. विशेष म्हणजे, या सेवेचे लोकार्पण दिव्यांग व्यक्ती सादेक शेख यांच्या हस्ते करण्यात आल्याने कार्यक्रमाला सामाजिक संवेदनशीलतेचा अनोखा ठसा उमटला.

या लोकार्पण सोहळ्यास कळंब-धाराशिवचे आमदार कैलास पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, शिवसेना नेते अजित पिंगळे, अमजद मुल्ला,श्रीधर भवर, संजय मुंदडा, मुस्ताक कुरेशी, डॉ. शाह जाकिर हमीद, मुफ्ती फारूक, मुफ्ती हाजी पाशा, हाफिज आरेफ, हाफिज खालेद, हाफिज वसीम, मौलाना इन्नुस, मौलाना दिलशाद,शाह रफिक तांबोळी, मिनाज शेख, शिवसेना () कळंब तालुकाध्यक्ष सचिन काळे , रोहन पारख, महादेव महाराज अडसूळ, अतुल कवडे, दत्ता तनपुरे, भैय्यासाहेब खंडागळे, किरण हौसलमल, अनिल हजारे, मंगेश अष्टेकर, बाळासाहेब कथले, रुकसाना बागवान, मोसिन मिर्झा, बालाजी गायकवाड, सतपाल बनसोडे, विकास कदम, सचिन शिनगारे जिव्हेश्वर कुचेकर, गणेश त्रिवेदी, प्रवीण झोरी, शहाजान शिकलकर,अनंत बोराडे,नानासाहेब धाकतोडे,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थिती लावली.

ही ॲम्बुलन्स सेवा पूर्णतः 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर सुरू करण्याचा निर्णय दयावान प्रतिष्ठानने घेतल्यामुळे कळंब शहर तथा ग्रामीण भागातील रुग्णांना परवडणाऱ्या दरात तातडीची वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहे.मागील काही वर्षापासून दयावान प्रतिष्ठान नेहमीच समाजोपयोगी उपक्रमांत आघाडीवर आहे. गतवर्षी प्रतिष्ठाने अनाथ मुलींसाठी फिक्स डिपॉझिट योजना राबविली होती या उपक्रमा अंतर्गत भागातील १६ मुलींना याचा लाभ मिळाला तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीचे निमित्त साधून दयावान प्रतिष्ठान तर्फे शहरात १२५ संविधान प्रतीचे वाटप करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने भीम जन्मोत्सव साजरा करण्यात आला होता. तर कोरोना काळात गरजूंपर्यंत किराणा किट पोहोचवून मोठ्या प्रमाणावर मदत केली होती.यावर्षी हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या १५०० व्या जयंतीचे निमित्ताने आयोजित या उपक्रमामुळे रुग्णांना तातडीच्या आरोग्यसेवेचा दिलासा मिळणार असून ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळ मिळेल.



आगामी काळात या सेवेचा अधिक विस्तार होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.या वेळी दयावान प्रतिष्ठानचे अध्यक्ष इम्रान भाई मुल्ला, उपाध्यक्ष इम्रान काझी, सचिव अभय गायकवाड, समीर सय्यद, मुबीन मनियार, अलीम दारूवाले, फरमान सय्यद, हुजेब बागवान, इरफान शेख, अक्षय सातव, शफिक शेख, कलीम शेख, नादेर शेख, सम्राट गायकवाड, सलमान शेख, नदीम शेख, अमर मुल्ला, मोसिन मुल्ला, अमर चाऊस, शौकत शेख, शिवा शिंगणापुरे, अफरोज सय्यद,अमन मोमीन, आदिल सय्यद, मुजाहिद मोमीन, नसीर शेख, रिजवान खान,सद्दाम शेख, मुशीर मणियार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गाव नकाशावरील रस्ते होणार खुले

### महसूल विभागामार्फत सेवा पंधरवडाअंतर्गत विशेष अभियान

जामखेड । प्रतिनिधी

गाव नकाशावरील रस्ते खुले होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, महसूल विभागामार्फत यासंदर्भात विशेष मोहीम राबवली जाणार आहे. त्यामध्ये अतिक्रमण झालेले गाव नकाशावरील रस्ते खुले होणार आहेत. यामुळे सार्वजनिक वापराचे आणि शेतरस्ते खुले होणार असल्याने शेतकऱ्यांसाठी ही मोठी पर्वणी ठरणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी जयंती दिवस २ ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्य सरकारमार्फत मंडळ स्तरावर महाराजस्व अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवड्याचे आयोजन तालुक्यात करण्यात आलेले आहे. तालुक्यातील महसूल विभागांतर्गत सर्वच स्तरावरील ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांची निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी तत्पर निकालात काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्याचा हा यामागचा हेतू आहे. यामध्ये प्रत्येक शेतकऱ्याला शेतावर जायला रस्ता मिळावा यासाठी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात गाव नकाशावर असलेल्या सर्व रस्त्यांचे शेत पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करणे व ज्या पाणंद रस्त्यांच्या नोंदी निस्तारपत्रक, वाजिब ऊल अर्जामध्ये करण्यात आलेली नाही. त्यांच्या नोंदी घेण्याची कार्यवाही करणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन निश्चित करणे, अशी कामे करण्यात येणार आहेत. विविध प्रकरणांमध्ये तहसीलदारांनी रस्त्याबाबत दिलेल्या निकालांच्या नोंदी वाजिब ऊल अर्जामध्ये घेणे अशी कामे केली जाणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत घरे बांधण्यासाठी निर्वाध्यरित्या वाटपास असलेली शासकीय जमीन कब्जाहक्काने प्रदान करणे या उपक्रमासाठी अस्तित्वातील रहिवासी प्रयोजनासाठी असलेली शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमातील तरतुदीनुसार नियमानुकूल करण्यात येतील.

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार ज्ञानेश्वर आसाराम येवले रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(१२२२ ) दि.२५/४/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र. दि.०८/९/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती महादेव रामकिशन सुरूंग रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.() ज्याचा मिळकत क्रमांक () चे भुखंड क्रमांक (३९५३) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- २० फुटाचा रस्ता
पश्चिम-लिंबाळकर यांचे घर
दक्षिण-उगले यांचे घर
उत्तर-दत्ता आनडे

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (21x52) फुट जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार वंदना सतीश गाडगे रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(२७४७ ) दि.१४/९/२०२१ सत्यप्रत जोडून आवक क्र. दि.१०/९/२४ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती डॉ.नंदकिशोर रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.() ज्याचा मिळकत क्रमांक () चे भुखंड क्रमांक (१५६९) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- टी.एन.बोकन
पश्चिम-२० फुटाचा अंतर्गत रस्ता
दक्षिण-२० फुटाचा अंतर्गत रस्ता
उत्तर-२० फुटाचा अंतर्गत रस्ता

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (24x30) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार निखिल लक्ष्मीकांत विश्वास रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(३३१ ) दि.२६/१/२०२१ सत्यप्रत जोडून आवक क्र.१४६४ दि.२०/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती सादेक सलीम शेख रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(१३६) ज्याचा मिळकत क्रमांक () चे भुखंड क्रमांक (679/A/1) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- बाबु यांची मालमत्ता
पश्चिम-अंतर्गत रस्ता
दक्षिण-उबाळे यांची मालमत्ता
उत्तर-सागरबाई रणशूर यांची मालमत्ता

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (15x60 फुट) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार गोविंद मधुकरराव पाठक रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(वाटणीपत्र ) दि.१९/८/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र.१४६३ दि.२०/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती मधुकर पंडितराव पाठक रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.() ज्याचा मिळकत क्रमांक () चे भुखंड क्रमांक (२२६२) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- रस्ता
पश्चिम-डॉ.जाधव यांचे घर
दक्षिण-कुलकर्णी यांची मालमत्ता
उत्तर-देशमुख यांचे घर

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (60x40 फुट) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार सादेक सलीम शेख रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(६८५ ) दि.१९/३/२०२० सत्यप्रत जोडून आवक क्र.१४६५ दि.२०/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती शेख अफसर शेख बाबामिया रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(१३६) ज्याचा मिळकत क्रमांक () चे भुखंड क्रमांक (६७९) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- बाबु यांची मालमत्ता
पश्चिम-रस्ता
दक्षिण-उबाळे यांची मालमत्ता
उत्तर-सागरबाई रणशुर यांची आज घेतलेली जागा

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (15x60 फुट) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार सिंधुबाई शिवाजी मुजमुले रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(२४६८ ) दि.१४/८/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र.१४५४ दि.१८/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती भिकुप्रसाद जोधीप्रसाद वर्मा रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(१३८) ज्याचा मिळकत क्रमांक (२३) चे भुखंड क्रमांक () मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- रामेश्वर पवार यांचा प्लॉट क्र.२२
पश्चिम-६ मिटरचा रोड
दक्षिण-वैजीनाथ राऊत प्लॉट क्र.१३
उत्तर-९ मिटरचा रोड

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (216) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

## जाहिर प्रगटन

जा.क्र.२०२०/नपप/नामांतर नोंद/जा.क्र./कावि
दिनांक १०-९-२५
कार्यालय नगर परिषद, परतूर जि.जालना

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की अर्जदार असहर अली सय्यद रा.परतुर ता.परतुर जि.जालना यांनी नामे परतुर जि.जालना यांच्याकडून नोंद/नामांतर करणेबाबत रजिस्टर दस्त क्र.(२३२९ ) दि.३१/७/२०२५ सत्यप्रत जोडून आवक क्र.१४७० दि.२१/८/२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा श्री/श्रीमती इम्राण आमेर मोहमद सिद्दिकी रा.परतुर जि.जालना यांच्या नावावर असलेला गट नं./सर्वे नं.(८८) ज्याचा मिळकत क्रमांक (६) चे भुखंड क्रमांक (१३०८) मधील क्षेत्र ज्याची चतु:सिमा-

पुर्व- संतोष गिरी
पश्चिम-१५ मिटरचा रोड
दक्षिण-संजय देवराव यांची मालमत्ता
उत्तर-रामेश्वर गंगाधर घनवट

या वरील चतु:सिमा मधील क्षेत्र (80x20 फुट) चौ.मी.जागा खरेदीदस्त आधारे नामांतर करणेबाबत कोणाचेही काही उजर/आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाचे आत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह आक्षेप अर्ज दाखल करावा नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतरासाठी कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्क्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**स्वाक्षरी/-**
**नगर परिषद परतुर**

# शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी करणार अंमळनेर येथे रेल रोको

## पिंपळवंडी परिसरातील शेतकरी मावेजापासून वंचित

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी व परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी बीड-अहिल्यानगर रेल्वे मार्गासाठी संबंधित विभागाने अधिग्रहण केलेल्या आहेत.त्यापैकी अनेक शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत भूसंपादन विभागाच्या अनेक चुकीमुळे व हलगर्जीपणामुळे मावेजा मिळाला नसून शेतकरी मावेजापासून वंचित राहिलेले आहेत. दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे सेवेला सुरुवात होत आहे.दि.१७ सप्टेंबर २०२५ पूर्वी संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांना त्वरित मावेजा देण्यात यावा नसता संबंधित



शेतकरी दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी अंमळनेर रेल्वे स्टेशन येथे रेल रोको आंदोलन करणार आहेत,याबाबत शेतकऱ्यांनी लेखी निवेदन जिल्हाधिकारी साहेब बीड,उपमुख्य अभियंता निर्माण अहिल्यानगर,बीड परळी रेल्वे मार्ग,उपविभागीय अधिकारी पाटोदा,

तहसीलदार साहेब तहसील कार्यालय पाटोदा,पोलीस स्टेशन अंमळनेर यांना देऊन रेल रोकोचा इशारा दिला आहे. निवेदनात त्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वाढीमध्ये संपादित करून त्या जमिनीचे अद्याप पर्यंत मोजमाप झालेले नाही.व त्याचा मावेजाही दिलेला नाही.तसेच दि.१७ सप्टेंबर पूर्वी वाढीव संपादित जमिनीचा स्पॉट पंचनामा करून तत्काळ मावेजा देण्याची मागणी केली आहे.संबंधित संपादित विभागाने ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित झालेली नाही अशा शेतकऱ्यांची ७/१२ नुसार नावे आल्याने भूसंपादित लाभार्थ्यांना मावेजांपासून वंचित राहावे लागत आहे.त्यामुळे प्रत्यक्ष ज्या शेतकऱ्यांचे क्षेत्र संपादित झाले आहे.अशा शेतकऱ्यांना १७ सप्टेंबरच्या आत मावेजा वाटप करावा अशी मागणी केली आहे.तसेच पिंपळवंडी ते कुसळंब रस्त्यावरील रेल्वे पुलाखाली नाली नसल्याने पाणी सडकेवर येऊन वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत आहे.अनेक दोन चाकी वहाने घसरुन अपघात होत आहेत.आश्रुबा जरे यांच्या घरा जवळ संरक्षण भिंत नसल्याने घराला तडे गेले आहेत. सदरील पुलाला संरक्षण भिंतीची गरज आहे,तरी संबंधित विभागाने संरक्षण भिंतीचे व नालीचे काम करून देण्याचे निवेदनात म्हटले आहे.

# संभाजीनगर येथे राज्यस्तरीय अधिवेशन

## याच ठिकाणी होणार परिषद पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंग मंदिरात सकाळी १० वाजता होत आहे. याच ठिकाणी दुपारी तीन वाजता परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरावरील त्रैमासिक बैठक होणार आहे. अधिवेशन आणि या बैठकीला सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले आहे.




छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौका जवळील संत एकनाथ रंग मंदिरात दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यस्तरीय अधिवेशनास सुरुवात होणार आहे. मान्यवरांच्या हस्ते या अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, पान २ वर

# कलाकार-रसिकांची रेंज जुळली; अनिलदादांनी बीड रंगभूमीवर उभारला ऐतिहासिक नाट्य सोहळा!

**रेंज पाहिजे नाट्य प्रयोगासाठी बीडकरांची तौबा गर्दी; रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यात तरवळले आनंदाश्रू!**

बीड । प्रतिनिधी

अनिल दादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना प्रस्तुत 'रेंज पाहिजे' या नाटकाच्या माध्यमातून अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीड रंगभूमीवर नाट्यदिप प्रज्वलीत झाला असून कलाकार आणि रसिक प्रेक्षकांमध्ये नवचैतन्य संचारले. काल रोजी बीडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे भरगच्च रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत शहरातील सत्तर कलाकारांचा सहभाग असलेले





सोनल नहार लिखित आणि लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत रेंज पाहिजे या नाटकाचा पाहिला प्रयोग सादर झाला. बीड हा कलाकारांचाच बालेकिल्ला आहे. फक्त कुणीतरी पुढाकार घेण्याची आवश्यकता होती आणि हा पुढाकार चला, बीडच्या नाट्यपरंपरेला सुवर्णयुगाकडे नेऊ या म्हणत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी घेतल्याने बीडमध्ये खंडित पडलेल्या नाट्य परंपरेला पुन्हा नव्याने जोरदार प्रारंभ झाला असून संपूर्ण शहराच्या सांस्कृतिक चेतनेला नवजीवन लाभले आहे. सोनल नहार यांच्या समर्थ लेखणीतील संवाद, लक्ष्मीकांत दोडके यांच्या दिग्दर्शनातील ठाशीव छाप आणि तब्बल सत्तर कलाकारांचा एकत्रित सहभाग या त्रिवेणीने बीडच्या रंगभूमीवर एक अद्भुत असा सोहळा घडवून आणला. दोन महिन्यांच्या कष्टसाध्य तालमीमधून घडवलेली पान २ वर

# पाटोद्यात करोडो रुपयांची पंचायत समिती इमारत उद्घाटना अभावी धुळखात पडून, अधिकाऱ्याची निष्क्रियता चव्हाट्यावर!

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील जनतेच्या सुविधांसाठी शासनाकडून मंजूर करण्यात आलेला कोट्यवधी रुपयांचा निधी वापरून आधुनिक सोयीसुविधांनी युक्त अशी पाटोदा पंचायत समितीची शासकीय इमारत आणि कर्मचाऱ्यांची निवासस्थाने उभारण्यात आली. मात्र, या भव्य इमारतींचा वापर सुरू न होता ती आजही बंद दरवाज्यांत धुळ खात पडली आहेत. यामागे जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक प्रशासनाची बेफिकिरी व निष्क्रियता उघड झाली आहे.गेल्या काही वर्षांपूर्वीच या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून, लाखो-करोडो रुपये खर्च करून साकारलेले हे शासकीय प्रकल्प आज वाया



जाण्याच्या मार्गावर आहेत. अधिकाऱ्यांनी केवळ औपचारिक उदघाटनाची प्रक्रिया न केल्याने संपूर्ण इमारत बंद ठेवण्यात आली आहे. जनतेसाठी उभारलेली इमारत नागरिकांच्या उपयोगात न येणे म्हणजे शासनाच्या पैशांचा उघड उघड अपव्ययच असल्याची नाराजी जनतेतून व्यक्त होत आहे.सध्याच्या पंचायत समिती कार्यालयात कर्मचारी व अधिकारी यांना अत्यंत गैरसोयीच्या,अवस्थेतील इमारतीत काम करावे लागते. विजेच्या समस्या, जागेची कमतरता, पावसाळ्यात गळक्या छपराचे प्रश्न असे एक ना अनेक प्रश्न जुन्या इमारतीत रोज निर्माण होत आहेत. याउलट कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून बांधलेली नवीन इमारत अधिकारी वर्गाच्या निष्क्रियतेमुळे वापराविना पडून आहे. सामाजिक कार्यकर्त्यांचा जाहीर सवाल आहे की जिल्हा परिषदेचे सीईओ साहेब, स्थानिक अधिकारी आणि लोकप्रतिनिधी एवढ्या मोठ्या प्रकल्पाकडे कानाडोळा करून पान २ वर

# वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ.साबळे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक म्हणून रायगड येथून डॉ.सुरेश अर्जुन साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ.सुरेश साबळे यांच्या नियुक्तीबद्दल अजिंक्य वाघमारे मित्र परिवाराच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते अजिंक्य वाघमारे,राज सोनवणे,लक्ष्मण काठवडे, बाळासाहेब निरडे, विनायक देशमुख, नंदकिशोर निसर्गंध, मोहन शिंदे,कृष्णा बनकर,इमरान



शेख,किशोर घेणे, कृष्णा काजळे, बाळू घेणे,समीर आत्तार,आशिष धाईजे,गणेश घेणे, बालाजी घेणे, दीपक हिरवे, अमोल पाबळे, विश्वजीत अलकुंटे, मुंजाबा जमदाडे, आदित्य घेणे, विशाल घेणे,रोहित घेणे,अशोक काजळे व अजिंक्य वाघमारे मित्र परिवार उपस्थित होता.

माजलगाव येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधीक्षक डॉ.मोहन कट्टे यांची कारकीर्द वादग्रस्त राहिली असून ते नेहमी गैरहजर असल्याच्या अनेक तक्रारी जनतेतून पान २ वर

# जि.प.च्या आरोग्य विभागातील कनिष्ठ सहाय्यक पठाण निलंबित

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके तीन वर्षापासून प्रलंबित ठेवली आणि गंभीर तक्रारी झाल्यामुळे आरोग्य विभागातील कनिष्ठ सहाय्यक फेरोज पठाण यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केलेल्या कारवाईमुळे कामचुकार आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्याचे धाबे दणाणले आहे.

यासंदर्भातील माहिती अशी की, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील कर्मचारी फेरोज पठाण हे कनिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत आहे. कर्मचाऱ्याची वैद्यकिय देयके विहित कालावधीत काढण्यात येत नाहीत, या आणि इतर गंभीर तक्रारी करण्यात आल्या होत्या. मनोज वाघमारे, जाधव आदींनी याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. याबाबत चौकशी करण्यात आली. चौकशीत दोषी आढळून आल्याने पठाण यांना निलंबित करण्याचे आदेश दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी देण्यात आले आहे.

# वडवणी तालुक्यातील शिवसेना शिंदे गटाची कार्यकारिणी जाहीर

वडवणी । प्रतीनिधी

शिवसेना शिंदे गट वडवणी तालुका प्रमुख माऊली गोंडे यांनी तालुक्यातील इतर कार्यकारणी व जिल्हा परिषद कार्यकारणी तयार केली असून त्यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप व इतरांच्या हस्ते बीड येथे नियुक्तीपत्र देण्यात आले आहेत.

गेल्या दोन महिन्यापूर्वी माऊली गोंडे यांची शिवसेना ( शिंदे गट) वडवणी तालुकाप्रमुख पदी निवड झालेली असुन त्यांनी वडवणी तालुक्यात शिवसेनेचे नवचैतन्य निर्माण केले आहे त्यांनी अवघ्या दोन महिन्यात लोकांशी जनसंपर्क



वाढवून तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन आणि तालुका कार्यकारणी व जिल्हा परिषद सर्कल कार्यकारणी करण्यासाठी माननीय जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांना शिफारस केली व काल शनिवार रोजी त्यांच्या शिफारशीनुसार खालील प्रमाणे वडवणी तालुक्यात नियुक्तीपत्राचे वाटप माननीय अनिल दादा जगताप जिल्हाप्रमुख, स्वप्नील भैय्या गलधर,रविराज बडे यांच्या हस्ते करण्यात आले सदरील नियुक्तीपत्र

# मातंग समाजाचे आमरण उपोषण: अॅट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपीला तात्काळ अटक करा

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील तलवट बोरगाव येथील मातंग समाजाच्या महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी अॅट्रासिटी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. परंतु अद्याप आरोपीस अटक करण्यात आले नाही या करिता सकल मातंग समाजाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळ्यासमोर आमरण उपोषणास राम साबळे



,विनोद हातागळे, संतोष हातागळे, बसले आहे.

सविस्तर दिं. ३/९/२०२५ रोजी महिला नामे कल्पना नागेश लोणके, वय वर्षे २७ व्यवसाय मंजुरी रा.खड्की देवळा, तलवट बोरगांव ता. गेवराई जि. बीड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिं. ०३/०९/२०२५ रोजी तलवाडा पोलीस स्टेशन गु.र.नं. २७२/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३३३, ७४, ३५१(२), ३५१(३), ३५२ अनुसुचीत जाती आणि अनुसूचित जमाती अत्यचार प्रतिबंध अधिक १९८९ चे कलम ३(१) (आर), ३(१) (एस) अन्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे सोमनाथ दिलीप गाडे, रा.तळवट बोरगांव ता. गेवराई जि.बीड यास आज पर्यंत नमुद गुन्ह्यामध्ये अटक झाली नाही. सदर आरोपी हा त्याचे गावामध्ये मौजे तळवट बोरगांव पान २ वर

# एस.टी.प्रवर्गाच्या मागणीसाठी बंजारा समाजाच्या विराट मोर्चात सहभागी व्हा - प्रा.पी.टी.चव्हाण

बीड । प्रतिनिधी

हैदराबाद गॅझेटीअर नुसार आंध्रप्रदेश व तेलंगाना राज्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळत आहे.त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण मिळावे या संविधानीक मागणीसाठी सोमवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी बीड



जिल्हाधिकारी कार्यालयावर बंजारा समाजाचा विराट मोर्चा धडकणार आहे,या ऐतिहासिक मोर्चात बीड जिल्ह्यातील वाडी वस्ती तांड्यावरील बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने सहभागी होऊन समाजाची वज्रमूठ आवळावी असे आवाहन राष्ट्रीय बंजारा राजकीय परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.पी.टी.चव्हाण यांनी केले आहे.

स्वातंत्र्यापूर्वी म्हणजे १९४८ पर्यंत मराठवाडा निझाम स्टेट मध्ये समाविष्ट करण्यात आला होता तसेच सी.पी.बेरार आताचा विदर्भाचा मध्यप्रदेशात समावेश करण्यात आला होता.निझाम स्टेट व सी.पी.बेरार प्रांतातील बंजारा समाजाला एस.टी प्रवर्गाच्या सवलती मिळत होत्या.संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर मराठवाडा व विदर्भ हे दोन्ही प्रदेश महाराष्ट्राला जोडण्यात आल्याने आपोआपच एस.टी.प्रवर्गाच्या सवलती बंद करण्यात आल्या व त्याऐवजी विमुक्त जातीचे आरक्षण लागू करण्यात आले.

यामुळे एक भाषा, समान वेशभूषा, आपसातील रोटी बेटी व्यवहार,सण-त्योहार, संस्कृती-परंपरा,जातपंचायत, समाजाचे धार्मिक आदर्श एकसमान असताना बंजारा समाजावर प्रचंड अन्याय झाला आहे. हैदराबादच्या गॅझेटीअरच्या धर्तीवर मराठवाडा सह महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण विनाविलंब देण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्रातील बंजारा समाजाने रान पेटवले आहे. सर्वत्र विविध प्रकारचे आंदोलन करुन शासन प्रशासनावर प्रचंड दबाव निर्माण केला आहे. पान २ वर


# उपोषणाची चेतावणी अन् तलावात आलं पाणी

**अॅड.राज पाटील यांनी उपोषणाचा इशारा देताच सोन्नाखोटा प्रकल्पाचे पाणी मामला चिंचोटी तलावात सोडले**

वडवणी । प्रतिनिधी

तुडुंब भरून वाहत असलेल्या सोन्नाखोटा येथील अप्पर कुंडलिकाचे पाणी मामला चिंचोटी तीगाव या छोट्या छोट्या तलावांना कालव्याद्वारे सोडावे अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष राज पाटील यांनी प्रशासनाकडे केली होती. पाणी सोडले नाही तर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनापासून उपोषण करण्यात येईल असा इशारा राज पाटील यांनी दिला होता. माजलगाव







### आमदार प्रकाश दादा सोळंके यांचा पाठपुरावा आला कामी

मतदार संघाचे लोकप्रिय नेते आमदार प्रकाश दादा सोळंके साहेब यांनी प्रशासनाला या तलावात पाणी सोडणे किती गरजेचे आहे त्या दृष्टीने सूचना केल्या त्यामुळे शुक्रवारी पाटबंधारे विभागाच्या वतीने तलावात पाणी सोडण्यात आले. त्यामुळे लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष पान २ वर

### १७ सप्टेंबरचे उपोषण स्थगित होणार

मामला आणि चिंचोटी तलावात पाणी सोडण्यात येत आहे तीगाव तलावात देखील येत्या दोन दिवसात पाणी सोडण्यात येण्याची शक्यता आहे जर तीगाव तलावातही पाणी १७ सप्टेंबर च्या आत सोडण्यात आले तर राज पाटील उपोषण मागे घेणार आहेत.

# जय भवानी महाविद्यालयाचा आदर्श शिक्षक निवडण्यात येणार -प्राचार्य विश्वास कदम

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने यावर्षी महाविद्यालयाचा आदर्श शिक्षक निवडण्यात येणार आहे अशी माहिती महाविद्यालयाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वासराव कदम व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर सोमनाथ घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडण्यात येणार आहे भारतीय शिक्षण व्यवस्थेत गुरु शिष्याची परंपरा ही अत्यंत महत्त्वाची आहे आणि कोणत्याही महाविद्यालयात शिक्षण घेत असताना शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते शिक्षका असलेल्या कलागुणांना विद्यार्थ्यांच्या मार्फत त्याचे मूल्यमापन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मतदान करून



निवडलेल्या शिक्षकाला आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येणार आहे या निवडीत गुप्त मतदान पद्धत अवलंब करून विद्यार्थी मतदान करून आपला आदर्श गुरु निवडतील ज्या शिक्षकास बहुमत मिळेल त्यास महाविद्यालयाच्या आदर्श शिक्षक

पुरस्काराने गुणगौरव करण्यात येणार आहे मतदान कार्यक्रम अधिकारी म्हणून प्राध्यापक डॉक्टर लोखंडे बी बी आणि डॉक्टर घारगे मॅडम यांनी काम पाहिले आहे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदान करून आपला आदर्श शिक्षक निवडण्यात आला आहे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजित पवारांनी ऐकल्या तब्बल ४ हजार तक्रारी; जनसंवाद अभियानाची सुरूवात

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी हडपसर येथे जनसंवाद या अभियानाची सुरुवात केली. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना थेट शासकीय यंत्रणेशी संवाद साधण्याची संधी मिळाली. यासाठी व्हॉट्सअॅप चॅटबॉट्स, डिजिटल किऑस्क्स आणि मिस्ड कॉल क्रमांकासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. पारदर्शक तक्रार निवारण प्रणालीमुळे शेकडो नागरिकांच्या समस्या थेट अधिकाऱ्यांपर्यंत सहज पोहोचल्या.



तक्रार नोंदणी, संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत ती पोहोचविणे, विभागीय समन्वयातून तोडगा काढणे आणि नियमित फॉलो-अप अशी सुसज्ज यंत्रणा 'जनसंवाद'मध्ये राबविण्यात आली आहे. नागरी सेवांतील तसेच विविध विभागांच्या कामकाजातील तफावत दूर करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, स्थानिक आमदार चेतन तुपे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुभाष जगताप यावेळी उपस्थित होते.

हडपसर येथील कार्यक्रमात तब्बल ३० शासकीय विभाग सहभागी झाले. या ठिकाणी नागरिकांनी ४ हजारांहून अधिक तक्रारी मांडल्या, त्यापैकी १५०० हून अधिक तक्रारींचे निराकरण जागीच करण्यात आले. तक्रारींमध्ये पाणीपुरवठा आणि वाहतूक कोंडीचे मुद्दे विशेषत्वाने मोठ्या प्रमाणावर नोंदविण्यात आले. अजित पवार यांनी सकाळपासून दुपारचे जेवण न घेता, उशिरापर्यंत संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवून जास्तीत जास्त समस्यांवर तोडगा काढला.

प्रत्यक्ष संवाद, शासकीय यंत्रणेचा पाठिंबा आणि अत्याधुनिक डिजिटल साधनांचा वापर या त्रिसूत्रीवर आधारित 'जनसंवाद' हा पुण्यातील पहिलाच प्रयोग ठरला आहे. या उपक्रमातून नागरिक, शासकीय विभाग आणि राजकीय नेतृत्व एका व्यासपीठावर आले असून, लोकप्रतिनिधी व जनतेतील विश्वासाची वीण अधिक मजबूत झाली आहे.या मोहिमेअंतर्गत नागरिकांना विभागनिहाय डिजिटल किऑस्क्स, व्हॉट्सअॅप चॅटबॉट्स आणि हेल्पलाईन क्रमांकाद्वारे तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे. प्रत्येक तक्रारीची नोंद करून तिचे नियमानुसार परीक्षण व पाठपुरावा होत असल्याने वेळेवर कारवाई करणे सुलभ झाले आहे.

# अश्लील वर्तन व मारहाण प्रकरणी आरोपींना शिक्षा; शिरूर न्यायालयाचा कठोर निकाल

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यात घडलेल्या अश्लील वर्तन व मारहाण प्रकरणी दोन आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवत शिक्षा सुनावली आहे. भारतीय दंड विधान कलम २९४, ३५२, ३४ अंतर्गत दाखल झालेल्या या गुन्ह्याचा निकाल काल (१२ सप्टेंबर) रोजी मे. सी. एम. खारकर सो. यांच्या न्यायालयात लागला.



गणेगाव दुमाला (ता. शिरूर) येथील प्रवीण रामराव गरुड (वय ३८) व रामराव बापूराव गरुड (वय ७१) या दोघांना न्यायालयाने दोषी ठरवत कलम २९४ अंतर्गत प्रत्येकी एक महिन्याची साधी कैद व दोन हजार रुपये दंड, तसेच कलम ३५२ अंतर्गत प्रत्येकी पाचशे रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. न्यायालयीन निकालामुळे गावात या प्रकरणाची चांगलीच चर्चा सुरू आहे.या प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता अॅड. सागर वसंतराव कदम व अॅड. ए. बी. शिर्के यांनी सरकारी बाजू प्रभावीपणे मांडली. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार ए. जे. जगदाळे यांनी काटेकोरपणे केला होता.याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे (पुणे ग्रामीण) व जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी आपली जबाबदारी पार पाडली. त्यांना पोलीस हवालदार तुकाराम गोरे व महिला पोलीस अंमलदार मनीषा फंड यांनी कोर्ट अंमलदार म्हणून साथ दिली. तर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक नकाते यांनी भूमिका बजावली.या निकालामुळे कायदा व सुव्यवस्थेवर विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. न्यायालयाने गुन्हेगारांना दिलेली शिक्षा ही समाजात अनुकरणीय ठरेल, अशी प्रतिक्रिया परिसरात उमटली आहे.

# कुरुळी पंचक्रोशीत तळेगाव-उरुळी कांचन रेल्वे मार्गाला तीव्र विरोध

**चिंबळी । प्रतिनिधी**

**तळेगाव ते उरुळी कांचन प्रस्तावित रेल्वे लोहमार्गाला खेड तालुक्यातील कुरुळी पंचक्रोशीतील शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. यासंदर्भात कुरुळी (ता. खेड) येथे नुकतीच सभा आयोजित करण्यात आली होती. कुरुळी, मोई, निघोजे, चिंबळी, केळगाव आदी गावांच्या हद्दीतून जाणाऱ्या या रेल्वे मार्गाला स्थानिकांचा विरोध असून, सरकारने विश्वासात न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.**



या सभेत परिसरातील ग्रामपंचायतींमार्फत ग्रामसभा घेऊन रेल्वे लोहमार्गाविरोधात ठराव मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा ठराव केंद्र आणि राज्य सरकारच्या संबंधित विभागांना सादर केला जाणार असून, पुढील आंदोलनासाठी कृती समिती स्थापन करण्याचे नियोजन आहे. प्रस्तावित रेल्वे मार्गामुळे परिसरातील गुंठेवारी पद्धतीने जमीन घेऊन बांधलेली अनेक कामगारांची घरे धोक्यात आली आहेत. यामुळे स्थानिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

सभेला माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, पीएमआरडीए सदस्य वसंत भसे, माजी जिल्हा परिषद सदस्य शांताराम सोनवणे, माजी सभापती विलास कातोरे यांच्यासह सुमारे तीनशे शेतकरी, ग्रामस्थ आणि प्रकल्प बाधित नागरिक उपस्थित होते.

माजी आमदार दिलीप मोहिते पाटील म्हणाले, तळेगाव-उरुळी कांचन रेल्वे लोहमार्गाला कुरुळी पंचक्रोशीतील शेतकरी आणि नागरिकांचा तीव्र विरोध आहे. हा केंद्र सरकारचा प्रकल्प असल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ घेऊन केंद्रीय आणि राज्य मंत्र्यांसमोर निवेदन सादर करून चर्चा करू.

पीएमआरडीए सदस्य वसंत भसे यांनी सांगितले, तळेगाव-उरुळी कांचन रेल्वे मार्गाच्या डीपीआरला पुणे महानगर नियोजन समितीची मान्यता अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे हा डीपीआर बेकायदेशीर ठरतो.

दरम्यान, स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी एकजुटीने या प्रकल्पाला विरोध करण्याचा निर्धार केला आहे. ग्रामसभांमधून ठराव मंजूर करून आणि कृती समिती स्थापन करून आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्याचे नियोजन आहे.

# बंद पडलेल्या रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्याची मागणी; अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर - आंबेगाव तालुक्यांना जोडणारा आणि दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या (गायमुख फाटा ) मार्गे अवसरी - पारगाव -जांबूत - पिंपरखेड मार्गे शिक्रापूर या रस्त्याच्या रुंदीकरणासह सिमेंट काँक्रीटीकरणाचे कामासाठी सुमारे ४१६ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. या माध्यमातून पहिल्या टप्प्यात सुरू केलेले जांबूत -पिंपरखेड काठापूर या रस्त्याचे काम सद्यस्थितीत बंद पडले असून ऐन पावसाळ्यात उकरून ठेवलेला काठापूर-पिंपरखेड जांबुत रस्ता चिखलमय होऊन निसरडा झाल्याने रस्त्यावरून प्रवास करताना अनेक छोट्या-मोठ्या अपघाताच्या घटना घडत असल्याने संबंधित अधिकारी ठेकेदार यांनी रस्त्याचे बंद पडलेले काम त्वरित सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.



जांबुत, पिंपरखेड, काठापूर ग्रामस्थांनी केली असून रस्त्याची झालेली दयनीय अवस्था पाहता असून अडचण नसून खोळंबा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पुढील पंधरा दिवसांत तात्काळ या रस्त्याचे काम सुरु करावे अन्यथा आम्हाला आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते शांताराम वरे व ग्रामस्थांनी दिली. महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास सुविधा महामंडळ (चडखऊउ )च्या माध्यमातून गायमुख - पारगाव - पिंपरखेड- जांबुत शिक्रापूर हा रस्ता रुंदीकरणासह सिमेंट काँक्रीटचा करण्यात येणार आहे. जांबुत - पिंपरखेड - काठापूर रस्त्याचे रुंदीकरणाचे काम पाच महिने झाले सुरू आहे. पूर्वीचा डांबरी रस्ता दोन्ही बाजूने पूर्णपणे खोदून रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे. जांबुत ते पंचतळे या रस्त्याचे एका बाजूच्या लेनचे अर्धवट सिमेंट काँक्रिट करण्यात आले असून उकरलेल्या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झालेली दिसून येते. या आधीचा रस्ता उकरल्याने त्यावरील डांबर पूर्णपणे नामशेष होऊन मातीचा थर पूर्णपणे वर आलेला असून रस्त्याची अवस्था पाहता त्यावर मुरूम टाकणे गरजेचे असताना रस्त्याचे कामच बंद आहे. ऐन पावसाळ्यात शालेय विद्यार्थी, नागरिकांना दैनंदिन प्रवास करताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

# दहशत माजविण्यासाठी पिस्तूल बाळगणारा सराईत गजाआड; दोन पिस्तुलासह मॅगझीन, काडतुसे जप्त

पुणे । प्रतिनिधी

दहशत माजविण्यासाठी पिस्तूल बाळगणाऱ्या सराईतला पर्वती पोलिसांनी गजाआड केले. त्याच्याकडून देशी बनावटीची दोन पिस्तूल, चार मॅगझीन, दोन काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.



ओंकार दीपक जाधव ( २२, रा. साईसिद्धी चौक, आंबेगाव पठार, धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्या सराईताचे नाव आहे. पर्वती भागात पोलीस कर्मचारिर महेश मंडलीक, सद्दाम शेख गस्त घालत होते. त्यावेळी जाधव याच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीची दोन पिस्तूल, चार मॅगझीन, दोन काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. जाधव याने पिस्तूल कोणाकडून आणले ? यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली पर्वती पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक अनिता हिवरकर, उपनिरीक्षक किरण पवार, प्रकाश मरगजे, महेश मंडलिक,सद्दाम शेख, सूर्या जाधव, अमित चिव्हे, अमोल दबडे, श्रीकात शिंदे, मनोज बनसोडे यांनी ही कामगिरी केली.

# इंदापूर तालुक्यात मोदी विकास मॅरेथॉनचे आयोजन : प्रवीण माने

इंदापूर । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या जन्मदिनाच्या निमित्ताने इंदापूर तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने सेवा पंधरवडा साजरा करण्याची मोहिम सुरु आहे. शनिवारी (दि. १३ सप्टेंबर) भारतीय जनता पार्टीची इंदापूर तालुका कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



इंदापूर विधानसभा भारतीय जनता पार्टीचे युवा नेते प्रविण माने यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीच्या निमित्ताने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. विकास पुरुष मोदीजी यांच्या ७५ व्या जन्मदिनाच्या निमित्त महाराष्ट्र प्रदेश भाजपाच्या वतीने जे कार्यक्रम घेण्याचे आयोजित केले आहे. ते तब्बल पंधरा दिवस साजरे करण्यात येणार असून, संपूर्ण इंदापूर तालुक्यातील गावातून मोदीजींना शुभेच्छा देण्यासाठी हा उपक्रम राबवण्याचे इंदापूर भाजपाच्या वतीने ठरविण्यात आल्याचे प्रतिपादन प्रविण माने यांनी केले.रक्तदान शिबिर आयोजन, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता अभियान राबवणे, मोदीजींच्या आयुष्यावर आधारित प्रदर्शनी भरवणे, आरोग्य शिबिराचे आयोजन, विचारवंत संवाद परिषद, आयुष्यावर आधारित पुस्तकाचे वितरण करणे, राज्यातील विशेष व्यक्तींचा सन्मान करणे, मोदी विकास मॅरेथॉनचे आयोजन या आणि अशा असंख्य कार्यक्रमाची या पंधरवड्यात रेलचेल असल्याची माहिती माने यांनी दिली.

# पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद ; ७२% क्षेत्राची संमती

पुणे । प्रतिनिधी

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ भूसंपादनासाठी जमीन देण्यास शेतकरी स्वत:हून पुढे येत आहेत. मागील १९ दिवसांत सात गावांमधील १ हजार ९८० शेतकऱ्यांनी सुमारे २ हजार ३० एकर क्षेत्रासाठी जिल्हा प्रशासनाकडे संमतिपत्रे दिली आहे. एकूण क्षेत्राचा विचार करता तब्बल ७२ टक्के क्षेत्राची संमती मिळाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, पारगाव, मुंजवडी, खानवडी या सात गावांमधील जमिनीचे संपादन होणार आहे. पूर्वीच्या अधिसूचनेनुसार हे क्षेत्र २ हजार ६७३ इतके होते. आता त्यात १ हजार ३८८ हेक्टरची कपात होऊन हे क्षेत्र १ हजार २८५ हेक्टर करण्यात आले आहे. भूसंपादनासाठी दि. २५ ऑगस्ट २०२५ पासून संमतिपत्र स्वीकारण्यास जिल्हा प्रशासनाकडून सुरुवात झाली.

पहिल्याच दिवशी तब्बल ७६० शेतकऱ्यांनी सुमारे १ हजार ७० एकर क्षेत्रासाठी संमतिपत्रे दिली. दिवसेंदिवस यामध्ये वाढ होऊन आतापर्यंत ७२ टक्के शेतकऱ्यांनी विमानतळासाठी संमतिपत्रे सुपूर्त केली आहे. ज्या जागा मालकांनी संमतिपत्रे सादर केली आहेत, त्या जागा मालकांचा परतावा निश्चित झाला आहे. विमानतळासाठी संमती देण्यासाठी दि. १८ सप्टेंबरपर्यंत मुदत आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.



# आर.आर.आर. सेंटर हा गरजूंचा आधार - उप आयुक्त सचिन पवार

## आर.आर.आर. सेंटरमध्ये वस्तू जमा करण्याचे महापालिकेकडून नागरिकांना आवाहन





**पिंपरी । प्रतिनिधी**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकाराने शहरात रीड्यूस - रीयुज - रिसायकल (आर.आर.आर ) सेंटर सुरू करण्यात आले आहेत. मोरवाडी येथील कापसे उद्यानातील आर.आर.आर. सेंटरला शनिवारी महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी भेट देऊन उपक्रमाचा सविस्तर आढावा घेतला.

शहरातील आठही प्रभागांत उभारण्यात आलेल्या या केंद्रांमधून नागरिकांकडून घरात पडून असलेल्या पण अजूनही उपयोगी वस्तू संकलित केल्या जात आहेत. त्यानंतर या वस्तू गरजूंपर्यंत मोफत पोहोचवल्या जातात. या उपक्रमामुळे शहरातील कचऱ्याचे प्रमाण कमी होत असून गरजूंना उपयुक्त साहित्य सहज उपलब्ध होत आहे.घरातील वापरण्यायोग्य वस्तू कचऱ्यात न टाकता जर या केंद्रांवर आणल्या, तर त्या इतरांना उपयोगी पडू शकतात. हे पर्यावरण संवर्धनासह सामाजिक जाणीवेचेही काम आहे. त्यामुळे नागरिकांनी आर.आर.आर. उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी यावेळी केले.महापालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली हा उपक्रम राबवला जात आहे. संकलित साहित्याचे प्रथम विलगीकरण करून त्यातील उपयुक्त वस्तू गरजूंना मोफत दिल्या जातात, तर उर्वरित वस्तू रिसायकल प्रक्रियेद्वारे नव्या स्वरूपात आणल्या जातात.यावेळी अ क्षेत्रीय सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे, आरोग्य निरीक्षक स्नेहा चांदणे, ओंजळ संस्थेचे पदाधिकारी व अन्य कर्मचारी आदी उपस्थित होते.

**नागरिक आर.आर.आर. सेंटरवर खालील वस्तू जमा करू शकतात :**

पुस्तके, वह्या, शालेय साहित्य, चांगल्या स्थितीतील कपडे, चादरी, पडदे, खेळणी, शैक्षणिक साधने, घरगुती साहित्य, भांडी, फर्निचर, छोटे-मोठे इलेक्ट्रॉनिक उपकरणे, चपला तसेच पुनर्वापर करता येणाऱ्या इतर वस्तू

# भोई प्रतिष्ठानकडून गणेशोत्सवातील कर्तृत्ववानांचा कृतज्ञता सन्मान

**पुणे । प्रतिनिधी**

**एखादे मंगल कार्य पार पाडण्यासाठी शेकडो हात अहोरात्र राबत असतात. मात्र कार्य पार पडल्यावर त्यांचा विसर पडतो. पण भारताची संस्कृती अशी आहे की, ज्या हातांनी कार्य पार पाडले त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. ही संस्कृती जपण्याचे काम भोई प्रतिष्ठान गेली २१ वर्षे करीत असून ही समाधानाची गोष्ट आहे. पोलिसांच्या सोबत अशा संस्था असल्यानेच गणेशोत्सवासारखा मोठा उत्सव निर्विघ्न पार पडतो, असे प्रतिपादन सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी केले.**

गणेशोत्सवात अहोरात्र राबून गणेशभक्तांची सेवा करणाऱ्या पुणे अग्निशमन दल, जीव रक्षक, आपत्कालीन वैद्यकीय मदत पथकातील डॉक्टर्स व रुग्णवाहिका चालक, नागरी संरक्षण दल आदी संस्थांचा भोई प्रतिष्ठानतर्फे कृतज्ञता सन्मान करून गौरव करण्यात आला.



या वेळी शर्मा म्हणाले, सोलापूरमध्ये झालेल्या डीजे-मुक्त गणेशोत्सवाचे अनुकरण पुणेकर पुढच्या वर्षी करतील, असा मला विश्वास आहे.

या कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, पोलीस तक्रार प्राधिकरणाचे न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर, ज्येष्ठ उद्योगपती कृष्णकुमार गोयल, राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. के. भागवत, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, ज्येष्ठ पत्रकार राजीव सावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजक व भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद भोई यांनी सांगितले की, गणेशोत्सवात पोलिसांच्या मदतीला अनेक संस्था व व्यक्ती धावून येतात. ते निरपेक्षपणे काम करतात आणि विस्मरणात जातात. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम गेली एकवीस वर्षे राबवला जातो.उमाकांत मिटकर यांनी या वेळी सांगितले की, पोलीस व नागरिक यातील दुवा म्हणून अशा संस्था कार्यरत असतात. त्यामुळे त्यांना पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. रुपाली चाकणकर यांनी महिलांचा वाढलेला सहभाग आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन घेत असलेल्या काळजीचे कौतुक केले. तर कृष्णकुमार गोयल यांनी सामाजिक स्वास्थ्य टिकवण्यात अशा संस्थांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले.या कार्यक्रमात गणेशोत्सव निर्विघ्न पार पाडण्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या अग्निशमन दल, जीव रक्षक, आपत्कालीन वैद्यकीय मदत पथक, मुस्लिम औकाफ वेल्फेअर ट्रस्ट, शेट ताराचंद रुग्णालय, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, महापालिका कामगार युनियन सफाई सेवक, पोलीस बांधव, पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यास, राष्ट्रीय कला अकादमी, नागरिक संरक्षण दल, महापालिका गणेशोत्सव समिती, शिल्पकार, चित्रकार, सजावटकार, सनई-चौघडा वादनकार, मंडप उभारणारे, ट्रॅक्टर व बैलगाडी चालक, समाधान पोलीस मित्र संघटना, रॉबिन हूड आर्मी आदींचा कृतज्ञता सन्मान करण्यात आला. यावेळी आशीष जराड यांनी सूत्रसंचालन केले.